

दैनिक
सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर संचालक-संपादक : अजय बिवडे



Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ८ | वर्ष : १ | अंक : ३२७ | किंमत : २ रूपये

ROKDE

शुभ धनतेरस

G.O.A.T OFFER

GREATEST OF ALL TIME

Till 11th Nov'26

फ्लैट 40% की छूट*
22KT गोल्ड ज्वेलरी के मेकिंग चार्जेस पर

फ्लैट 60% की छूट*
18KT गोल्ड ज्वेलरी के मेकिंग चार्जेस पर

फ्लैट 100% की छूट*
डायमंड ज्वेलरी के मेकिंग चार्जेस पर

पाएं 101%*
आपके पुराने सोने के मूल्य पर



*नियम एवं शर्तें लागू

पुराना सोना है? तो रोकड़े ज़रूर आइए!
अपने पुराने सोने की सही व्हॅल्यू जानें और एक्सचेंज व्हॅल्यू पर पाएं 1% अधिक।

हमारे सभी शोरूम आज सुबह 8:30 बजे से खुले रहेंगे!

22 कैरेट गोल्ड ज्वेलरी मेकिंग चार्जेस अब सिर्फ 5% से शुरू

ROKDE JEWELLERS

चंद्रपुर – गिरनार चौक 72491 11902
(शोरूम रविवार सहित सप्ताह के सभी दिन खुला रहेगा।)

गढ़चिरोली – चंद्रपुर रोड, होटल लैंडमार्क के सामने 72193 33494
(शोरूम बुधवार सहित सप्ताह के सभी दिन खुला रहेगा।)

वैलेट सर्विस और 2&4 व्हीलर पार्किंग की सुविधा उपलब्ध है

नागपुर | भंडारा | गोंदिया | चंद्रपुर | गढ़चिरौली आगामी: यवतमाल टोल फ्री नंबर: 1800 268 1010

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६

संपादकीय लेखणीतून...

ट्रम्पची अडचण

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांचे निकाल आणि कल येण्यास सुरुवात झाली आहे. विरोधी पक्ष डेमोक्रॅट्सने ८७ जागा जिंकून ट्रम्प यांच्या सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाला पिछाडीवर टाकले आहे. अमेरिकेच्या काँग्रेस या सर्वोच्च कायदेमंडळाच्या कनिष्ठ सभागृह (हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हज) आणि वरिष्ठ सभागृहाच्या (सेनेट) मध्यावधी निवडणुकीसाठी ३ नोव्हेंबर रोजी मतदान पार पडले. प्रतिनिधीगृहाच्या सर्व ४३५ तर सेनेटच्या १०० पैकी ३५ जागांसाठी निवडणूक होत आहे.

सध्या दोन्ही सभागृहांमध्ये रिपब्लिकन पक्षाचे वर्चस्व आहे. विविध वृत्तसंस्था आणि माध्यमांनी केलेल्या जनमत चाचण्यांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या लोकप्रियतेत घसरण झाल्याचे दिसत आहे. तरीही डेमोक्रॅटिक पक्षाला बहुमत मिळेलच असा अंदाज वर्तवण्यात आलेला नाही. इराणचे न संपलेले युद्ध, युद्धामुळे भडकलेल्या तेलाच्या किमती आणि महागाई हे मुद्दे अमेरिकी मतदारांसाठी महत्त्वाचे असल्याचे विविध जनमत चाचण्यांमधून उघड झाले आहे. एप्स्टीन फाईलचा मुद्दाही ट्रम्प आणि रिपब्लिकन पक्षासाठी अडचणीचा ठरत आहे. ही निवडणूक ट्रम्प यांच्या विरोधात गेली तर अमेरिकेच्या राजकारणाला कलाटणी मिळू शकते. निवडणुकीनंतर इराणवर पुन्हा हल्ले सुरू करण्याचा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. आतापर्यंत इराण युद्धावर ४७ अब्ज डॉलर इतका खर्च झाल्याचे पेंटागॉनने जाहीर केले आहे. तरीसुद्धा आपल्याला इराण युद्ध संपवण्याची कोणतीही घाई नाही, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. मध्यावधी निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाला काँग्रेसवर नियंत्रण मिळवण्यात यश आले तर ट्रम्प यांची घोडदौड रोखली जाऊ शकेल. काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाला बहुमत मिळाले तर त्यांची कोणतीही योजना मंजूर होऊ देणार नाही, असे ट्रम्प यांनी एका मुलाखतीत म्हटले आहे. प्रतिनिधीगृहाच्या ४५३ जागांपैकी रिपब्लिकन पक्षाचे २१८ तर डेमोक्रॅटिक पक्षाचे २१४ सदस्य आहेत.

एक सदस्य अपक्ष आहे. सेनेटमध्ये रिपब्लिकन पक्षाचे ५३ तर डेमोक्रॅटिक पक्षाचे ४५ सदस्य आहेत. दोन अपक्ष सदस्य डेमोक्रॅटिक पक्षाबरोबर आहेत. यावेळी मतदानाच्या तारखेआधी ५ कोटी मतदारांनी मतदान केले, त्यात डेमोक्रॅटिक पक्षाच्या मतदारांची संख्या अधिक होती. अमेरिकेची सूत्रे हाती घेतल्यापासून ट्रम्प यांनी अनेक वादग्रस्त निर्णय घेतले. त्यांच्या बहुतांश निर्णयांचा जागतिक अर्थव्यवस्थेसह जगभरातील सर्वसामान्य कुटुंबांच्या घरखर्चावरही मोठा परिणाम झाला. त्यामुळे या निकालांचे परिणाम केवळ अमेरिकेपुरते मर्यादित न राहता जगभरात उमटण्याची शक्यता आहे. २०२४ मध्ये झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत ट्रम्प यांनी डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार आणि तत्कालीन उपाध्यक्ष कमला हॅरिस यांचा पराभव केला होता. ट्रम्प यांचा यापूर्वीचा राजकीय प्रवास अनेक वादांनी भरलेला होता. अमेरिकेच्या इतिहासात दोन वेळा महाभियोगाला सामोरे जाणारे ते पहिले अध्यक्ष ठरले होते. गुन्हेगारी प्रकरणात दोषी ठरलेले ते पहिले माजी अध्यक्ष आणि पदावर असताना दोषी ठरलेले पहिले विद्यमान अध्यक्षही होते. असे असतानाही दोन प्रमुख मुद्यांवर दिलेल्या आश्वासनांमुळे ट्रम्प यांना २०२४ च्या निवडणुकीत मोठा विजय मिळाला.

अमेरिकेच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी बेकायदा स्थलांतरावर नियंत्रण आणणे आणि स्थलांतरविषयक धोरण अधिक कठोर करणे हे त्यांचे पहिले आश्वासन होते, तर वाढती महागाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या गगनाला भिडलेल्या किमतीमुळे सर्वसामान्य नागरिकांवर पडणारा आर्थिक भार कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. स्थलांतराच्या मुद्यावर ट्रम्प प्रशासनाने घेतलेल्या निर्णयांचे परिणाम दिसून आले असले तरी अर्थव्यवस्थेच्या आघाडीवर ट्रम्प प्रशासनाच्या अडचणी वाढल्या आहेत. अमेरिकेच्या आर्थिक विकासाचा वेग कायम आहे. कोरोना आला नसता तर अमेरिकन अर्थव्यवस्थेला अधिकच भरभराट मिळाली असती. असे असले तरी मतदार नाराज होण्याचे मुख्य कारण म्हणजे वेगाने वाढणारा महागाईचा दर. त्या तुलनेत नागरिकांचे वेतन किंवा उत्पन्न वाढलेले नाही. इराण युद्ध सुरू झाल्यापासून किरकोळ इंधनाच्या किमतीमध्ये सुमारे ५० टक्क्यांनी वाढ झाली पण प्रत्यक्षात सर्वसामान्यांच्या उत्पन्नात कोणतीही वाढ झाली नाही. ट्रम्प यांनी आपल्या धोरणात्मक निर्णयामुळे अमेरिकन नागरिकांचे नुकसान होत असल्याचे मान्य केलेले नाही. त्यामुळे मतदार नाराज आहेत, त्यांना बदल हवा आहे.



'व्होट चोर' विरुद्ध 'संविधान चोर' : राजकीय रणांगणात लोकशाहीचा कस

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

'व्होट चोरी' (मतदान चोरी) हा विषय सध्या भारतीय राजकारणात एक अत्यंत वादग्रस्त मुद्दा बनला असून, विरोधी आणि सत्ताधारी पक्षांकडून एकमेकांवर विविध स्वरूपाचे राजकीय आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सत्ताधारी भारतीय जनता पक्षावर (भाजप) आणि निवडणूक आयोगावर निवडणूक प्रक्रिया तसेच मतदार याद्यांमध्ये हेरफेर करून 'व्होट चोरी' केल्याचा गंभीर आरोप केला आहे, तर दुसरीकडे सत्ताधाऱ्यांनी या आरोपांना केवळ राजकीय अपप्रचार आणि आधारहीन दावे म्हटले आहे.

'व्होट चोर विरुद्ध संविधान चोर' हा वाद सध्या भारतीय राजकारणात, विशेषतः महाराष्ट्र आणि देशाच्या पातळीवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये अत्यंत तीव्र झाला आहे. १ नोव्हेंबर २०२६ रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर झालेल्या 'वोट बचाओ, देश बचाओ' महारॅलीनंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जोरदार आरोप-प्रत्यारोप केले आहेत. राहुल गांधींच्या वोट चोरी आंदोलनाला संविधान चोर म्हणून काँग्रेसला जोरदार प्रत्युत्तर देत आहे. व्होट चोरीचा आरोप करणाऱ्या काँग्रेसने प्रत्यक्षात संविधान चोरी केली असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेसवर केला आहे.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीसह हरियाणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रसह विविध राज्यांमध्ये मतदार याद्यांमध्ये फेरफार आणि ईव्हीएम द्वारे 'व्होट चोरी' (मतदान चोरी) झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर सत्ताधारी पक्षाशी मिळवून फेरफार केल्याचा आणि पारदर्शकता न दाखवल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

"व्होट चोरी" प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा त्यांनी १ नोव्हेंबर २०२६ रोजी नवी दिल्लीतील एका रॅलीत दिला आहे.

भाजपा आता काँग्रेसवर प्रहार करण्यासाठी 'संविधान चोर' हे अभियान राबवत आहे. काँग्रेसकडून लावण्यात आलेल्या 'व्होट चोरी' (मतचोरी) च्या आरोपांना भारतीय जनता पक्षाने (भाजप) आक्रमकपणे प्रत्युत्तर दिले असून विरोधकांनाच 'संविधान चोर' म्हटले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी काँग्रेसवर पलटवार करत आणीबाणीच्या काळातील घटनांची आठवण करून दिली आहे. ठाण्यातील भाजपच्या 'लोकशाही वाचवा' (लोकतंत्र बचाओ, अराजकता मिटाओ) आंदोलना दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोप केला की, १९७५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लावून संविधानाची मोडतोड केली होती. फडणवीस म्हणाले, "जे लोक आज 'व्होट चोरी'च्या खोट्या घोषणा देत आहेत, त्यांनीच भूतकाळात 'संविधान चोरी' केली होती. त्यामुळे तेच खरे संविधान चोर आहेत."

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजप नेत्यांनी आरोप केला की, काँग्रेस 'व्होट चोरी'चा बहाणा करून मतदार यादीतील बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांची नावे वाचवण्याचा प्रयत्न करत आहे. भाजप प्रवक्ते संबित पात्रा यांनी दावा केला की, देशातील पहिली मतचोरी काँग्रेसच्या काळात झाली, जेव्हा सरदार वल्लभभाई पटेल यांच्याऐवजी पंडित नेहरूंना पंतप्रधान बनवले गेले. या राजकीय संघर्षामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासह देशातील राजकीय वातावरण कमालीचे तापले असून, दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर लोकशाही आणि संविधान धोक्यात आणल्याचे आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत.

'व्होट चोरी' विरुद्ध 'संविधान चोर' हा वाद केवळ दोन राजकीय पक्षांतील आरोप-प्रत्यारोपांचा विषय राहिलेला नाही, तर तो भारतीय लोकशाहीच्या विश्वासार्हतेशी, निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेशी आणि घटनात्मक संस्थांवरील जनतेच्या विश्वासाशी निगडित गंभीर प्रश्न बनला आहे. काँग्रेसकडून मतदार याद्या, निवडणूक प्रक्रिया आणि ईव्हीएमबाबत उपस्थित करण्यात येत असलेल्या शंका आणि आरोपांची वस्तुनिष्ठ, पारदर्शक व कायदेशीर प्रक्रियेतून चौकशी होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, कोणतेही गंभीर पुरावे नसताना लोकशाही संस्थांवर सातत्याने संशय निर्माण करणेही लोकशाहीसाठी तितकेच घातक ठरू शकते.

दुसरीकडे, भाजपकडून काँग्रेसवर करण्यात येत असलेले संविधान चोर आणि आणीबाणीच्या काळाशी संबंधित आरोप हे इतिहासातील गंभीर घटनांची आठवण करून देतात. मात्र, भूतकाळातील चुका दाखवून वर्तमानातील प्रश्नांपासून दूर जाता येणार नाही. लोकशाहीत प्रत्येक राजकीय पक्षाला प्रश्न विचारण्याचा आणि उत्तर देण्याचा अधिकार आहे; परंतु आरोपांना केवळ राजकीय घोषणांनी नव्हे, तर तथ्य, पुरावे आणि स्वतंत्र चौकशीच्या आधारे उत्तर मिळाले पाहिजे.

आज सर्वांत महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, निवडणूक प्रक्रिया केवळ निष्पक्ष असणे पुरेसे नाही, तर ती निष्पक्ष असल्याचा विश्वास जनतेच्या मनात दृढ राहणेही आवश्यक आहे. मतदार यादीतील त्रुटी, मतदान प्रक्रियेबाबतच्या शंका किंवा निवडणूक व्यवस्थापनासंबंधी कोणतेही आरोप असतील, तर त्यांचे पारदर्शक आणि विश्वासार्ह निराकरण झाले पाहिजे. निवडणूक आयोगासारख्या घटनात्मक संस्थांनीही अधिकाधिक पारदर्शकता आणि संवादाच्या माध्यमातून जनतेचा विश्वास अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

व्होट चोरी आणि संविधान चोरीच्या राजकीय घोषणांमध्ये खरा मुद्दा हरवू नये. कारण शेवटी मत हे लोकशाहीचे सर्वांत मोठे शस्त्र आहे आणि संविधान हा त्या लोकशाहीचा आत्मा आहे. मताचा अधिकार आणि संविधानाची प्रतिष्ठा या दोन्हींचे संरक्षण करणे ही केवळ सत्ताधारी किंवा विरोधकांची नव्हे, तर प्रत्येक भारतीय नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. राजकीय संघर्ष कितीही तीव्र असला, तरी लोकशाही संस्थांवरील विश्वास, निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि संविधानाची सर्वोच्चता यांना धक्का पोहोचणार नाही, याची काळजी घेणे आजच्या काळाची सर्वांत मोठी गरज आहे.

कारण लोकशाही जिंकली किंवा हरली जाते ती केवळ निवडणुकीच्या निकालात नाही, तर त्या निकालावर जनतेचा विश्वास किती अबाधित राहतो यावर ठरते.

- ९५६१५९४३०६

भारत - न्यूझीलंड, पहिल्या एकदिवसीय सामन्यातील लक्षवेधी प्रसंग!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

ऑकलंडमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने न्यूझीलंडला ५ गडी राखून पराभूत केले. विराट कोहलीने सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडत, लक्ष्याचा पाठलाग करताना सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनण्याचा मान मिळवला. रोहित शर्मा वनड कारकिर्दीत सतराव्यांदा शून्यावर बाद झाला. अर्शदीप सिंगने काईल जेमिसनला बाद केल्यानंतर आपल्या प्रेयसीला समर्पित करत नृत्य केले.

पहिल्या भारत-न्यूझीलंड एकदिवसीय सामन्यात घडलेले प्रमुख विक्रम आणि क्षण...

कोहलीने सचिनचा विश्वविक्रम मोडला

कोहलीने एकदिवसीय क्रिकेटमध्ये लक्ष्याचा पाठलाग करताना सर्वाधिक ८७४१ धावा केल्या आहेत. त्याने सचिन तेंडुलकरच्या ८७२० धावांचा टप्पा ओलांडला.

कोहलीने पाँटिंगच्या विक्रमाची बरोबरी केली विराट कोहलीने न्यूझीलंडविरुद्ध एकदिवसीय सामन्यांमध्ये १,९७१ धावा पूर्ण केल्या आहेत. यासह त्याने ऑस्ट्रेलियाच्या रिकी पाँटिंगच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. या बाबतीत दोन्ही फलंदाज संयुक्तपणे अव्वल स्थानी आहेत.

कोहलीने तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना १३,००० धावा पूर्ण केल्या

एकदिवसीय सामन्यांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना १३,००० धावा करणारा विराट कोहली जगातील पहिला खेळाडू ठरला आहे. हा टप्पा गाठण्यासाठी कोहलीला १२ धावांची गरज होती. डावाच्या ७ व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर आपली १२ वी धाव पूर्ण करून त्याने हा विक्रम साधला. एकदिवसीय सामन्यांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पाँटिंग दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने या स्थानावर १२,६६२ धावा केल्या आहेत.

कोहलीने न्यूझीलंडमध्ये ३५ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केले

विराट कोहलीने ३५ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. परदेशातील एकदिवसीय सामन्यांमधील हे त्याचे दुसरे सर्वात वेगवान अर्धशतक आहे. या फॉरमॅटमधील त्याचे सर्वात वेगवान अर्धशतक ३४ चेंडूंमध्ये पूर्ण झाले होते. त्याने २०१६ मध्ये कॅनबेरा येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध हा पराक्रम गाजवला.

रोहितने शून्यावर बाद होऊन गांगुलीचा विक्रम मोडला

रोहित एकदिवसीय सामन्यांमध्ये १७व्यांदा शून्यावर बाद झाला. त्याने या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक वेळा शून्यावर बाद होण्याचा सौरव गांगुलीचा विक्रम मोडला. गांगुली आपल्या एकदिवसीय कारकिर्दीत १६ वेळा शून्यावर बाद झाला होता.

भारताविरुद्ध न्यूझीलंडची घरच्या मैदानावरची चौथी सर्वात कमी एकदिवसीय धावसंख्या

ऑकलंडमध्ये भारताविरुद्ध न्यूझीलंडचा संघ १८५ धावांवर सर्वबाद झाला. घरच्या मैदानावर भारताविरुद्ध न्यूझीलंडची ही चौथी सर्वात कमी एकदिवसीय धावसंख्या आहे. भारताविरुद्ध न्यूझीलंडची सर्वात कमी धावसंख्या १९९४ मध्ये नोंदवली गेली होती, जेव्हा ते ऑकलंडमध्ये १४२ धावांवर सर्वबाद झाले होते.

११व्या क्रमांकावर फलंदाजी करताना टिकनरने ४ षटकार मारले

ब्लेअर टिकनरने ऑकलंडमध्ये ४ षटकार मारले. त्याने एकदिवसीय सामन्यांमध्ये ११व्या क्रमांकावर फलंदाजी करताना सर्वाधिक षटकार मारण्याच्या विक्रमाची बरोबरी केली. यापूर्वी पाकिस्तानच्या मोहम्मद अमीर आणि नसीम शाह यांनी हे केले होते.



इथले काही खास क्षण...

न्यूझीलंडच्या रग्बी खेळाडूच्या हस्ते गिल, कोहली आणि रोहित यांना जर्सी भेट

सामना सुरू होण्यापूर्वी, भारतीय कर्णधार शुभमन गिल, विराट कोहली आणि रोहित शर्मा यांनी न्यूझीलंडचे रग्बी खेळाडू केविन मेलामू यांची भेट घेतली. सामन्यादरम्यान, या तिन्ही भारतीय खेळाडूंना त्यांच्या नावांच्या विशेष रग्बी जर्सी भेट देण्यात आल्या. न्यूझीलंडच्या रग्बी खेळाडूने गिल, रोहित आणि कोहली यांची भेट घेतली.

पावसामुळे सामन्याला विलंब

पावसामुळे नाणेफेकीला विलंब झाला. सामनाही १० मिनिटे उशिरा सुरू झाला. भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ७:३० वाजता नियोजित असलेला सामना सायंकाळी ७:४० वाजता सुरू झाला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पावसादरम्यान खेळपट्टीवर आच्छादन टाकण्यात आले होते.

कोहलीने ग्लेन फिलिप्सला जॉन सीनाचा हावभाव दाखवला

न्यूझीलंडच्या डावात ग्लेन फिलिप्स फलंदाजीसाठी आला. तेव्हा विराट कोहलीने हहए कुस्तीपटू जॉन सीनाचा प्रसिद्ध 'यू कान्ट सी मी' हावभाव त्याच्या चेहऱ्यासमोर फिरवून केला.

यामागे एक रंजक कारण होते. जेव्हा जेव्हा फिलिप्स न्यूझीलंडमध्ये फलंदाजीसाठी येतो, तेव्हा स्टेडियममधील डीजे अनेकदा जॉन सीनाचे एन्ट्री म्युझिक वाजवतो. या संगीतासोबत सीना त्याच्या चेहऱ्यासमोर हात फिरवण्याचा एक विशेष हावभाव करतो. याचा अर्थ होतो, "तुम्ही मला पाहू शकत नाही." कोहलीने जॉन सीनाचा प्रसिद्ध 'यू कान्ट सी मी' हावभाव केला.

अर्शदीपने त्याच्या गर्लफ्रेंडसाठी खास डान्स केला

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज काईल जेमिसनला बाद केल्यानंतर, अर्शदीप सिंगने असे डान्स स्टेप्स केले की प्रेक्षकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला की हा आनंदोत्सव कोणासाठी होता. पहिला डाव संपल्यानंतर एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अर्शदीपने यावर प्रतिक्रिया दिली. त्याने स्पष्ट केले की, हा डान्स त्याची गर्लफ्रेंड समरीन कौरसाठी होता. अर्शदीप म्हणाला, "आम्ही बाहेर फिरताना अशा डान्स स्टेप्स करतो. जेव्हा कधी आमचा मूड खराब असतो, तेव्हा आम्ही अशा प्रकारे एकमेकांना प्रोत्साहन देतो. त्यामुळे हा आनंदोत्सव त्यांच्यासाठी होता."

झेल घेतल्यानंतर कोहलीने बाणासारखी खूण केली

न्यूझीलंडच्या डावादरम्यान, विराट कोहलीने स्लिप्समध्ये नॅथन स्मिथचा झेल घेतला. स्मिथच्या बॅटची कड चेंडूला लागली आणि चेंडू वेगाने खाली आला. कोहलीने उजवीकडे झेप घेतली आणि एका हाताने झेल घेतला. झेल घेतल्यानंतर, कोहलीने धनुष्य ओढून बाण सोडल्यासारखी खूण केली. झेल घेतल्यानंतर कोहलीने बाणासारखी खूण केली.

रोहितच्या थ्रोमुळे मिचेल धावबाद झाला

रोहितच्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणामुळे २२ व्या षटकात न्यूझीलंडची पाचवी विकेट पडली. अक्षर पटेलच्या पहिल्याच चेंडूवर शॉट खेळल्यानंतर ग्लेन फिलिप्स धाव घेण्यासाठी धावला. डॅरिल मिचेल यष्टीरक्षकाच्या दिशेने जात होता. दरम्यान, रोहित शर्माने मिडविकेटवरून चेंडू उचलला आणि अंडरआर्म थ्रो केला, आणि यष्टीरक्षक केएल राहुलने यष्टी उध्वस्त केल्या. मिचेलने क्रीजपर्यंत पोहोचण्यासाठी आपली बॅट सरकवली, पण रिप्लेमध्ये दिसले की त्याची बॅट थोडी कमी पडली. रोहितने मिचेलला धावबाद केले. त्याने झेप घेतली आणि चेंडू फेकला.

अर्शदीपचा बाउन्सर डफीच्या हेल्मेटला लागला

३४ व्या षटकात, अर्शदीप सिंगचा चेंडू जेकब डफीच्या हेल्मेटला लागला. चेंडू जास्त उसळी घेऊन आला आणि डफीचा पुल शॉट चुकला, त्यामुळे चेंडू हेल्मेटला लागला. हेल्मेटवरील पॅडिंग निघून स्टंपला लागले. मात्र, बेल्स पडल्या नाहीत. फिजिओने त्याची तपासणी केली, त्यानंतर खेळ पुन्हा सुरू झाला. चेंडू लागल्यानंतर डफीच्या हेल्मेटवरील पॅडिंग गळून पडले.

पावसात गोलंदाजी केल्याबद्दल गिल पंचांवर संतापला

१२ व्या षटकात मुसळधार पाऊस सुरू असतानाही पंचांनी खेळ चालू ठेवल्याने गिल संतापला. खरं तर, ब्लेअर टिकनरचा हा चेंडू गिलच्या बॅटच्या आतल्या बाजूला लागून यष्टीमागे गेला. मात्र, टॉम लॅथम तो झेलू शकला नाही. या चेंडूनंतर पंचांनी खेळ थांबवला. डगआऊटमध्ये परतताना, गिलने पंचांकडे नाराजी व्यक्त केली आणि विचारले की, त्याला चेंडू स्पष्ट दिसत नसतानाही अशा परिस्थितीत गोलंदाजी करण्याची परवानगी का देण्यात आली.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-
खामगाव-बुलढाणा-
अमरावती-वर्धा-यवतमाळ-
चंद्रपूर-गडचिरोली-
भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४६,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३४,३५० /-
✔ चांदी : १,९८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दिनांक : शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६
Epaper : epaper.sinhvani.com

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

'लोकशाही वाचवा, अराजकता हटवा'



नागपुरातही या अभियानांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजयुमोचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमांग जोशी यांच्या नेतृत्वात पदयात्रा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर
भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील त्यांच्या घटक पक्षांनी देशभरात 'लोकशाही वाचवा, अराजकता हटवा' अभियान सुरू केले आहे. गुरुवारी नागपुरातही या अभियानांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजयुमोचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमांग जोशी यांच्या नेतृत्वात पदयात्रा काढण्यात आले. या पदयात्रेपूर्वी झालेल्या सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांना इशारा दिला.

नागपुरात पदयात्रेपूर्वी यशवंत स्टेडियम येथे आयोजित सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारतीय संविधानाला डावलण्याचा प्रयत्न राहूल गांधी व त्यांचे सहकारी करत आहे, असा आरोप केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून संसदेत लढण्याचा अधिकार दिला आहे. परंतु काँग्रेस व त्यांचे सहकारी रस्त्यावर येत असेल तर आमचीही तयारी आहे. ४ कोटी बांगलादेशी नावे मतदार यादीत होती. ती काढल्याने त्यांना मतदान करता येणार नाही, म्हणून पोटशूळ उठला आहे. त्यांच्या मतावर सत्ता मिळवायची आहे, जनमताची चोरी करायची आहे, संविधानाची चोरी करायची आहे. श्रीलंकेत, नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तानसारखी स्थिती निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. परंतु या देशाजवळ डॉ. बाबासाहेबांचे संविधान नव्हते. संविधानाशी खेळाल तर राहुल गांधी यांचे जळतील, असा इशारा फडणवीस यांनी दिला. लोकशाही संपवून अराजकता माजवत आहे, म्हणून भाजप व रालोआचे सर्व पक्ष मैदानात उतरले आहे. ही लढाई लोकशाही वाचविण्याची आहे, असे ते म्हणाले.

राहुल गांधी यांच्या नेतृत्त्वात षडयत्र सुरू आहे. त्यांना सत्त पारिवर्तनासोबत लोकशाहीच्या व्यवस्थेत तसेच संविधानात परिवर्तन करायचे आहे. देशात अतिडावी व्यवस्था निर्माण करण्याची तयारी सुरू आहे. नेपाल, बांगालदेश, पाकिस्तान व श्रीलंकेत जे झाले, तेच देशात कायम करण्यासाठी षडयंत्र असून राहुल गांधी त्याचे प्रमुख आहे. काँग्रेसची भूमिका नेहमीच संविधानाच्या विरोधात राहिली आहे. संविधान हातात घेऊन संविधानाविरोधात कार्यक्रम सुरू आहे. काँग्रेसने सातत्याने हे काम केले. काँग्रेसने १९७५ मध्ये संविधान बदलण्याचे काम केले होते, असा आरोपही त्यांनी केला.

फडणवीस म्हणाले, १९७५ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची निवडणूक रद्द ठरवली. सर्वोच्च न्यायालयानेही हाच निर्णय कायम ठेवला. त्यामुळे इंदिरा गांधींना पंतप्रधान राहता येईल, पण संसदेत भाषण करता येणार नव्हते. काँग्रेसने पाशवी बहुमताच्या आधारावर संविधानात संशोधन केले. त्यात पंतप्रधान कुठल्याही न्यायालयाच्या अधीनस्थ राहणार नाही, असा बदल करून इंदिरा गांधी यांना पदावर स्थापित केले आणि संविधनाचा गळा कापला. मोरारजी देसाई यांनी पंतप्रधान झाल्यानंतर पंतप्रधान न्यायालयाच्या अधीन राहील, असे संशोधन केले. डॉ. बाबासाहेबांनी दिलेले अधिकार कायम ठेवले, असे फडणवीस म्हणाले.

उत्तराखंडमध्ये हिमस्खलनामुळे ६ ट्रेकर्सचा मृत्यू, २ बेपत्ता

वृत्तसंस्था, उत्तराखंड
उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील निसर्गरम्य पण तितक्याच आव्हानात्मक असलेल्या केदारताल ट्रेकिंग मार्गावर एक दुर्दैवी घटना घडली आहे. आठवड्यापूर्वी आलेल्या हिमस्खलनामुळे बेपत्ता झालेल्या आठ ट्रेकर्सपैकी गुरुवारी आणखी दोन जणांचे मृतदेह शोधून काढण्यात यश आले आहे. यासोबतच या दुर्घटनेतील मृतांची संख्या आता ६ वर पोहोचली असून, उर्वरित दोन ट्रेकर्सचा शोध अजूनही सुरू आहे. या संदर्भातील वृत्त ढळक या वृत्तसंस्थेने दिले आहे.



उत्तरकाशी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी ९ वाजता राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनियरिंग यांच्या संयुक्त पथकाने बचावकार्य पुन्हा सुरू केले. अत्यंत प्रतिकूल हवामान आणि बर्फाच्छादित दऱ्यांमध्ये दुपारच्या ३.३० वाजेपर्यंत चाललेल्या या मोहिमेत दोन पुरुषांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.

हिमस्खलनामुळे दुर्घटनेच्या ठिकाणी तब्बल १० ते १२ फूट बर्फाचा थर साचला आहे. त्यामुळे बचाव पथकांना शोधमोहीम राबवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गुरुवारी सापडलेले हे दोन्ही मृतदेह बेस कॅम्पवर आणण्यात आले असून, शुक्रवारी हेलिकॉप्टरच्या साहाय्याने ते मातली हेलिपॅडवर आणले जातील.

क्रिस्टियानो रोनाल्डोची आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती

व्हिडिओ पोस्ट करीत दिली माहिती

वृत्तसंस्था
फुटबॉलमधील दिग्गज खेळाडू क्रिस्टियानो रोनाल्डो यानं आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेत असल्याचं जाहीर केलं आहे. सोशल मीडियावर ५ नोव्हेंबरला व्हिडिओ पोस्ट करत रोनाल्डोनं निवृत्तीची घोषणा केली आहे. फुटबॉल विश्वातील दिग्गज खेळाडू अशी ओळख असलेल्या क्रिस्टियानो रोनाल्डो त्याच्या करिअरमध्ये मात्र वर्ल्ड कप जिंकू शकला नाही. या एका कमतरतेसह रोनाल्डोनं आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे.

क्रिस्टियानो रोनाल्डो यानं व्हिडिओत म्हटलं की, "पोर्तुगालच्या लोकांसाठी, आमच्या राष्ट्रीय संघाची ७ नंबरची जर्सी परत करण्याचा दिवस आला आहे, मी कधीच विचार केला नव्हता की ही जर्सी फक्त माझी असेल. मात्र २३ वर्षांपर्यंत ती जर्सी परिधान करण्याची, त्याचं रक्षण करण्याची आणि जगभरातील विविध मैदानांवर घेऊन जाण्याचं भाग्य आणि जबाबदारी मिळाली. आता ती जर्सी येणाऱ्या पिढ्यांना सोपवण्याची वेळ आली आहे, हा सोपा निर्णय नव्हता, असं रोनाल्डोनं म्हटलं.

रोनाल्डो पुढं म्हणाला की, काही निर्णय असे असतात जे डोक्यानं घ्यायचं नसतात तर मनातून घेतले जातात. आता एक असा प्रवास संपतोय ज्याची



सुरुवात ऑगस्ट २००३ मध्ये झाली होती. ज्यानं माझं आयुष्य कायमस्वरुपी बदललं. मी जेव्हा मागे वळून पाहतो आणि राष्ट्रीय संघासोबतच्या अनुभवाबाबत विचार करतो तेव्हा मला फक्त खेळस गोल, रेकॉर्ड किंवा ट्रॉफी दिसत नाही तर मी लोकांना पाहतो, त्या प्रवाशांना पाहतो, ज्यांना ९० मिनिटांसाठी पोर्तुगाल जवळचा वाटला. मी पोर्तुगालच्या लाखो लोकांना पाहतो, ज्यांना मी व्यक्तिगत कधी भेटलो नाही. मात्र, ते माज्या आयुष्याचा भाग राहिले. अखेर फुटबॉल खेळापेक्षा अधिक काही तरी आहे, फुटबॉलचा अर्थ लोक असल्याचं रोनाल्डोनं म्हटलं.

राष्ट्रीय संघासोबत पूर्ण करिअरमध्ये मी माझ्या मयार्दांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न केला. मला जिंकायचं होतं, मला सर्वोत्कृष्ट बनायचं होतं, मला इतिहास रचायचा होता. मी स्वतःकडून खुप आशा ठेवायचो. मला नेहमी अधिक हवं असायचं.

मला विश्वास होता की आम्ही आणखी पुढं जाऊ शकतो आणि मी या जर्सीसाठी सर्वकाही झोकून दिलं, असं क्रिस्टियानो रोनाल्डो म्हणाला. काही चांगल्या दुपारी तर काही चांगल्या रात्री होत्या. काही विजय होते ते विसरू शकत नाही. काही असे पराभव होते जे आज आठवले तरी वेदना होतात. मी अपयश देखील पाहिलं, मी कष्ट केलं, काही असे क्षण होते जे पोर्तुगालच्या लोकांना द्यायचे होते ते देऊ शकलो नाही. मात्र, मी कधीच हार मानली नाही. सर्वात मोठी गोष्ट पोर्तुगालचं प्रतिनिधीत्व करणं माझ्यासाठी नेहमी अभिमानाची गोष्ट आहे.

क्रिस्टियानो रोनाल्डोनं आंतरराष्ट्रीय करिअरमध्ये २३४ सामने खेळले. ज्यात त्यानं १४६ गोल केले. २० ऑगस्ट २००३ ला त्यानं कझाकिस्तान विरोधात आंतरराष्ट्रीय सामन्यात पदार्पण केलं होतं. तर, पहिला गोल २००४ मध्ये ग्रीस विरोधात केला होता.

कॉंक्रोच जनता पार्टीचा उद्या एसआयआर विरोधात जंतर-मंतरवर एल्गार

वृत्तसंस्था, नवी दिल्ली
मतदार याद्यांची विशेष सखोल तपासणी मोहिम रद्द करण्याच्या मागणीसाठी कॉंक्रोच जनता पाटीर्न पुन्हा एकदा आंदोलनाचं हत्यार उपसलं आहे. सीजेपीने येत्या ७ नोव्हेंबर रोजी मोठ्या आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनाचे नेतृत्व अभिजीत दिपके स्वतः करणार आहेत. त्यांच्यासोबत उखढ चे दक्षिण विभाग प्रमुख विजय मल्लांगी आणि राष्ट्रीय सचिव आफ्रीन नवाज हेदेखील या आंदोलनाला उपस्थित राहणार आहेत.



'लोकशाही वाचवा! एसआयआर रद्द करा!' ७ नोव्हेंबर, दुपारी ४ वाजता राजेंद्र मैदान, कोची येथे एकत्र या, असे आवाहन कॉंक्रोच जनता पार्टीने आपल्या पोस्टद्वारे केलं आहे. कोचीमध्ये जंतर मंतर या शीर्षकाखाली हे आंदोलन ७ नोव्हेंबरला दुपारी ४ वाजता केरळमधील कोची येथील राजेंद्र मैदान येथे पार पडणार असून पक्षाच्या अधिकृत (ट्विटर) हँडलवरून याबाबतची माहिती देण्यात आली आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मतदार याद्यांच्या विशेष पुनरीक्षण प्रक्रियेविरोधात दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन करण्याचा प्रयत्न करताना सहजेपीच्या प्रमुख नेत्यांना अटक झाली होती. त्या घटनेनंतर सीजेपीचे हे पहिलेच मोठे आणि महत्त्वाचे आंदोलन मानले जात आहे. मागील महिन्यात अभिजीत दिपके यांच्यासह आशुतोष रांका आणि सौरव दास यांना दिल्ली पोलिसांनी जंतर मंतरवर परवानगीशिवाय आंदोलन करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी ताब्यात घेतले होते.

प्रफुल पटेलांनी घेतली शरद पवारांची भेट, अमित शाह आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या भेटीबाबत पवारांकडून विचारणा

वृत्तसंस्था, मुंबई
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी गुरुवारी (५ नोव्हेंबर) त्यांची भेट घेतली. या भेटीत पवारांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासोबतच राजकीय विषयांवरही चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, या भेटीदरम्यान शरद पवार यांनी प्रफुल्ल पटेल यांच्याकडे केंद्रीय गृहमंत्री अमित



शाह यांच्यासोबत झालेल्या बैठकीबाबत विचारणा केली असल्याचं कळतंय. प्रफुल पटेल यांच्या भेटीपूर्वी आज सकाळी मंत्री छगन भुजबळ यांनी भेट घेत शरद पवारांची विचारपूस केली. तर, काँग्रेसचे आमदार विश्वजीत कदम यांनी देखील शरद पवार यांची भेट घेत प्रकृतीची विचारपूस केली.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटातील प्रमुख नेत्यांनी नुकतीच दिल्लीत अमित शाह यांची भेट घेतली होती. या बैठकीत नेमकी काय चर्चा झाली, कोणते राजकीय विषय मांडण्यात आले आणि या भेटीमागील भूमिका काय होती, याबाबत शरद पवारांनी प्रफुल पटेल यांच्याकडून माहिती घेतल्याचे समजते.विशेष म्हणजे, अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय समीकरणे आणि पक्षाच्या भविष्यातील वाटचालीबाबत विविध चर्चा सुरू आहेत. अशा परिस्थितीत शरद पवार आणि प्रफुल्ल पटेल यांची रुग्णालयातील भेट महत्त्वाची मानली जात आहे.

प्रफुल पटेल यांनी आदरणीय पवार साहेबांच्या ताब्यातीची माहिती घेण्यासाठी आलो असल्याची माहिती दिली. शरद पवार यांची तब्येत अतिशय चांगली आहे. त्यांना थकवा होता म्हणून रुबीला गेले होते,

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६

छठ पूजेनिमित्त येणाऱ्या भाविकांसाठी मनपा प्रशासन पूर्णतः सज्ज

महापौर यांच्या हस्ते छठ पूजा व्यवस्था कार्याचे भूमिपूजन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर
उत्तर भारतीयांच्या श्रद्धेचा धार्मिक उत्सव छठ पूजा नागपुरात हर्षोल्हासात साजरा केला जातो. अंबाझरी तलाव घाटावर मोठ्या संख्येत भाविक सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करतात. या उत्सवात सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा आणि व्यवस्था कार्याचे भूमिपूजन महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते गुरुवारी (ता.०५) करण्यात आले.
याप्रसंगी उपमहापौर लीला हाथीबेड, माजी महापौर दयाशंकर तिवारी, धरमपेठ झोन सभापती धनश्री देशपांडे, नगरसेवक अभिजीत झा, उपायुक्त राजेश भगत, सहायक आयुक्त राजकुमार मेश्राम, कार्यकारी अभियंता मनोज गद्रे, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.
यावेळी बोलताना महापौर निता ठाकरे म्हणाल्या, छठ व्रत पूजेमध्ये केवळ उत्तर भारतीय नागरिकच नव्हे तर नागपुरातील नागरिक आस्थेने सहभागी होतात. हा धार्मिक सण एकात्मतेचे दर्शन घडविणारा उत्सव ठरत आहे. अर्घ्य अर्पण करण्यासाठी अंबाझरी तलावावर येणाऱ्या भाविकांची संख्या दरवर्षी वाढत आहे. भाविकांना अडथळा होणार नाही, याची पूर्ण काळजी नागपूर महानगरपालिका प्रशासन घेईल, भाविकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सोयी- सुविधांसोबतच भाविकांच्या सुरक्षेकडेही विशेष लक्ष देण्यात येईल. तसे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहे. छठ पूजेच्या दिवशी पहाटे तलावावर भाविकांची गर्दी होणार असल्यामुळे आवश्यक ती प्रकाशव्यवस्थाही करण्यात येणार असल्याची माहिती महापौर यांनी दिली. छठ पूजेच्या निमित्ताने नागपूर महानगरपालिकेच्या वतीने अंबाझरी, फुटाळा आणि गोरेवाडा तलाव येथे सुरक्षेच्या दृष्टीने बॅरिकेटिंग, संपूर्ण परिसरात विद्युत व्यवस्था सार्वजनिक सूचना देण्यासाठी ध्वनिक्षेपक यंत्रणा, स्वागत कक्ष, श्रद्धाळूंना पूजा व्यवस्थेसाठी सुरक्षित घाटांचे अस्थायी निर्माण आदी व्यवस्था महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे.
छठ पूजा पर्वाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने महानगरपालिका निधीचे नियोजन करते. कुठल्याही प्रकारची दुर्घटना होऊ नये यासाठी अग्निशमन विभागाची आपात्कालिन यंत्रणा तत्पर राहील, मनपाच्या आरोग्य विभागाच्या वतीने रुग्णवाहिकेचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रसंगी सर्वश्री आशिष पांडे, सत्येंद्र प्रसाद सिंह, प्रा बच्चू पांडे, राजेंद्र कुमार पांडेय, संत लाला यादव, नितीश सिंह, केशव निखार , सौरभ झा आणि इतर उपस्थित होते.

दिवाळीचा पहिला दिवा छत्रपती शिवाजी महाराज व धर्मवीर संभाजी महाराजांच्या चरणी अर्पण



दै. सिंहवाणी वृत्त, तुळापूर
काल तुळापूर येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पवित्र समाधीस्थळी आयोजित केलेला मराठा शिवमुद्रा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने 'पहिला दिवा माझ्या राजाला' या संकल्पनेतून दिवाळीचा पहिला दीप शंभूराजांच्या चरणी अर्पण करण्याचा एक अत्यंत भावनिक, अभिमानास्पद आणि ऐतिहासिक विचारांचा सोहळा पार पडला.दीपोत्सव या उपक्रमाची संकल्पना मराठा शिवमुद्रा प्रतिष्ठान ने सुरू केली असून आज राज्यभर विविध संघटना हा उपक्रम राबवत आहेत त्याचा आम्हाला अभिमान आहे.
हा केवळ एक दिवा नव्हता, तर तो होता आपल्या राजाप्रती असलेली निष्ठा, प्रेम, आदर, कृतज्ञता आणि स्वाभिमानाचा प्रकाश! शंभूराजांच्या समाधीस्थळी दीप प्रज्वलित करताना प्रत्येकाच्या मनात एकच भावना होती, ती म्हणजे आपल्या राजांनी केलेल्या त्यागाची जाणीव आणि त्यांच्या विचारांप्रती असलेली आपली बांधिलकी. या सुंदर उपक्रमासाठी ज्यांनी आर्थिक सहकार्य केले तसेच आपला मौल्यवान वेळ देऊन सहकार्य केलेल्या सर्वत्र लक्ष देणारे सर्व पदाधिकारी मराठा शिवमुद्रा प्रतिष्ठानचे सर्व मावळे तसेच रणरागिनी,बाल मावळे तसेच सर्व थोर मंडळी यांचे देखील मनापासून आभार व्यक्त करतो कारण की तुम्ही आहेत म्हणूनच आपली ही संघटना आहे त्यासाठी पुन्हा एकदा सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करतो.
कोणी नियोजन केले, कोणी प्रसार केला, कोणी व्यवस्था सांभाळली, कोणी उपस्थित राहून सहकार्य केले, तर कोणी पडद्यामागे राहून मेहनत घेतली. प्रत्येकाचे योगदान मोलाचे होते. पद मोठे किंवा लहान नसते, तर संघटनेसाठी दिलेले योगदान मोठे असते, याची जाणीव काल पुन्हा एकदा झाली. कारण दिवाळीचा पहिला दिवा आपल्या घरात लावण्यापूर्वी तो आपल्या राजाच्या चरणी अर्पण करण्याची भावना हीच खरी शिवभक्ती आणि शंभूराजांप्रती असलेली कृतज्ञता आहे!

थोडक्यात

आजनी जिल्हा परिषद शाळेत दिवाळी सेलिब्रेशन



दै. सिंहवाणी वृत्त, कामठी
बुधवार दिनांक ०४ नोव्हेंबर रोजी कामठी तालुक्यातील आजनी येथे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे मुख्याध्यापिका ललिता आंडे यांच्या कल्पनेतून शाळेमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्याच्या हेतूने दिवाळी सेलिब्रेशन कार्यक्रम राबविण्यात आला. शाळेतील शिक्षक गण शीला जैन, नलिनी धकाते, सिमा मेश्राम, बुंदेले सर, करुणा ढोक आदींच्या नवनवीन कल्पनांनी शाळेतील विद्यार्थ्यांत नेहमीच आनंदाचे वातावरण असते.
दिवाळी निमित्त राबविण्यात आलेल्या सेलिब्रेशनमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा, दिवाळी ग्रीटिंग स्पर्धा, आकाश दिवे स्पर्धा घेण्यासह विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी संगीत खुर्ची आणि फुग्यांच्या खेळाचे आयोजन करण्यात आले होते. यात यश प्राप्त विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून तयार केलेला किल्ला यावेळी आकर्षण ठरला.याप्रसंगी पालक समितीच्या अध्यक्षा ललिता ठाकरे गावातील सरपंच हेमराज भाऊ दवंडे व इतर सदस्यांची विशेष उपस्थिती होती.

वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षणाच्या सुलभक निवडीत पारदर्शकतेचा अभाव?

उपशिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर सवाल

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर
येत्या १३ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत शिक्षकांसाठी वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणासाठी सुलभक शिक्षकांची निवड करताना नागपूर शहरातील गट युआरसी-२ अंतर्गत केवळ २० शाळांमधील शिक्षकांचीच नावे मागविण्यात आल्याने शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. युआरसी-२ अंतर्गत जवळपास दीडशेहून अधिक अनुदानित शाळा कार्यरत असताना सुलभक शिक्षकांच्या निवडीसाठी सर्व शाळांकडून नावे मागविण्याऐवजी केवळ निवडक २० शाळांतूनच नावे का मागविण्यात आली, असा सवाल शिक्षकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यात आली का, याबाबतही शंका व्यक्त केली जात आहे.
विशेष म्हणजे, संबंधित मुख्याध्यापकांनीही कोणतीही व्यापक चर्चा अथवा विचारविनिमय न करता शिक्षकांची नावे पाठविल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षणासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रातच जर निवड प्रक्रियेत पक्षपात होत असल्याचा संशय निर्माण होत असेल, तर इतर क्षेत्रांमध्ये पारदर्शकतेची अपेक्षा कशी करायची, असा प्रश्नही शिक्षकांकडून उपस्थित केला जात आहे. या संपूर्ण निवड प्रक्रियेबाबत शिक्षण विभागाने खुलासा करून सर्व पात्र शाळांना समान संधी का देण्यात आली नाही, याचे स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी शिक्षकांकडून होत आहे.

नीमा नागपूर शाखेतर्फे ६ नोव्हेंबरला धन्वंतरी जयंती उत्सव

२० वर्षांहून अधिक काळ वैद्यकीय व सामाजिक सेवा देणाऱ्या ज्येष्ठ डॉक्टरांचा 'धन्वंतरी सन्मान २०२६' पुरस्काराने गौरव

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर
नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (नीमा), नागपूर शाखेतर्फे शुक्रवार, ६ नोव्हेंबर रोजी धन्वंतरी जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त वैद्यकीय क्षेत्रात तसेच समाजसेवेत २० वर्षांहून अधिक काळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवर डॉक्टरांना धन्वंतरी सन्मान २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम दुपारी ३.३० वाजता. रेशीमबाग रोड, क्रीडा चौक, हनुमान नगर येथील श्री आयुर्वेद महाविद्यालयाच्या पीजी सभागृहात होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नवनिर्वाचित नागपूर पदवीधर मतदारसंघाचे आमदार अँड. अभिजित वंजारी उपस्थित राहतील. तसेच नागपूर महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते संजय महाकाळकर विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री आयुर्वेद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.एम.एम. जुमळे राहतील. यावेळी नीमा केंद्रीय शाखेचे डॉ. रवींद्र बोथरा, डॉ. शैलेंद्र अग्रवाल, डॉ. विकास चिटमूलवार, डॉ. मृण्मयी मासोदकर, तर राज्य शाखेचे डॉ. पंकज भोयर, डॉ. राहुल राऊत व डॉ. मीनाक्षी सराटकर यांची उपस्थिती राहणार आहे.
प्रमुख अतिथी अँड. अभिजित वंजारी यांचा नीमा नागपूर शाखेतर्फे शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नीमा नागपूर शाखेचे पदाधिकारी व सदस्य डॉ. नितीन कानोलकर, डॉ. शरद ठाकूर, डॉ. पंकज थुल, डॉ. वीणा फाये, डॉ. ममता रेवतकर, डॉ. वैशाली चरडे, डॉ. गौतम जोगड, डॉ. प्रशांत तुरणकर, डॉ. अमोल खत्री, डॉ. अनिमेष भोयर, डॉ. मुमताज आलम, डॉ. अर्पिता चाफले यांच्यासह इतर डॉक्टर परिश्रम घेत आहेत.

काळ्या बाजारात जाणाऱ्या रेशन तांदळाच्या चौकशीची मागणी

परभणी : सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील रेशनचा तांदूळ काळ्या बाजारात जाण्यापासून रोखण्यासाठी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी अशी मागणी भीम आर्मी भारत एकता मिशनच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. परभणी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीसमोरील धर्मकाट्यावर कोतवाली पोलिसांच्या पथकाने धाड टाकून दि. १ नोव्हेंबर रोजी ५०० कट्टे रेशनचा तांदूळ घेऊन जाणारा ट्रक (एम.एच. ०४ जीआर ४९०६) पकडला. जप्त करण्यात आलेल्या ५०० कट्टे तांदळाचा मूळ स्त्रोत कोणता? हे धान्य कोणत्या शासकीय गोदामातून अथवा स्वस्त धान्य दुकानातून बाहेर पडले याची सखोल व पारदर्शक चौकशी करण्यात यावी.

सावनेर येथे दोन दुचाकींची समोरासमोर धडक, तीन जण जखमी



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर
सावनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या आशीर्वाद मंगल कार्यालयाजवळ दोन दुचाकींची जोरदार धडक होऊन अपघात घडला. घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी आपल्या टीमसह तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अपघातातील जखमींना तातडीने सावनेर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.
अपघातातील जखमींची नावे रामनाथ अलोने (वय २७), रा. तेलकामठी, अनिकेत कोसरकर (वय २७), रा. ढालगाव खैरी, आदित्य घोंगरे (वय २०) अशी आहे. आदित्य घोंगरे यांच्या दुचाकीचा क्रमांक MHCR4557 असल्याची माहिती मिळाली असून, दुसऱ्या दुचाकीला क्रमांक नसल्याचे समजते. शासकीय रुग्णालयात डॉक्टरांनी जखमींची तपासणी केली. त्यानंतर आदित्य घोंगरे यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथे रेफर करण्यात आले.

दुष्काळ, कर्जाचा विळखा अन् वसुलीचा तगादा; भारसिंगीच्या ३८ वर्षीय शेतकऱ्याची आत्महत्या!

शेतीला जोडधंद्याची जोड देऊनही आर्थिक संकटातून सुटका नाही; एक लाखांचे कर्ज असल्याची कुटुंबीयांची माहिती; पत्नी, दोन चिमुकल्यांचे पितृछत्र हरपले



दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड
निसर्गाची अवकृपा, शेतीतून घटलेले उत्पन्न, डोक्यावर वाढत जाणारे कर्ज आणि कर्जाच्या हप्त्यांच्या परतफेडीचा ताण अशा आर्थिक संकटांच्या कात्रीत सापडलेल्या नरखेड तालुक्यातील भारसिंगी येथील ३८ वर्षीय अल्पभूधारक शेतकरी नारायण विठ्ठल वैद्य यांनी गुरुवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास राहत्या घराच्या परिसरातील निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. या दुर्दैवी घटनेमुळे भारसिंगी परिसरात शोककळा पसरली असून, शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक विवंचनेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.
नारायण वैद्य यांच्याकडे अल्पशा शेतीचा आधार होता. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले होते. केवळ शेतीवर अवलंबून न राहता त्यांनी चायनीजचा ठेला लावून जोडधंदाही सुरू केला होता. शेती आणि व्यवसाय अशा दोन्ही माध्यमांतून कुटुंबाचा गाडा चालविण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होता. मात्र, उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ बसत नसल्याने आर्थिक अडचणी कायम होत्या.
कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, नारायण वैद्य यांच्यावर अंदाजे एक लाख रुपयांचे कर्ज होते. यामध्ये मायक्रोफायनान्स संस्थांकडून घेतलेल्या कर्जाचाही समावेश होता. कर्जाच्या हप्त्यांच्या वसुलीसाठी तगादा सुरू असल्याचेही कुटुंबीयांनी सांगितले. एकीकडे शेतीतून उत्पन्नाची अनिश्चितता, दुसरीकडे कर्जफेडीची चिंता आणि संसाराचा वाढता खर्च अशा परिस्थितीत ते आर्थिक विवंचनेत होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक चित्र समोर येत असले, तरी आत्महत्येमागील नेमकी कारणे पोलिस तपासानंतरच स्पष्ट होणार आहेत.
नारायण वैद्य यांच्या पश्चात पत्नी, आठ वर्षांचा मुलगा, सात वर्षांची मुलगी, आई आणि भाऊ असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार असलेला कर्ता पुरुष अचानक हरपल्याने वैद्य कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अवघ्या आठ आणि सात वर्षांच्या दोन चिमुकल्यांच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र हरपल्याने परिसरातील नागरिकांकडून हळहळ व्यक्त होत आहे.
या घटनेचा तपास जलालखेडा पोलिस स्टेशनचे पोलिस करीत असून, आत्महत्येमागील नेमकी कारणे, कर्जाचा तपशील तसेच कर्जवसुलीच्या तगाद्याबाबत तपास सुरू आहे. दरम्यान, वैद्य कुटुंबाला शासनाच्या शेतकरी आत्महत्या मदत योजनेच्या निकषांनुसार तातडीने आर्थिक सहाय्य द्यावे, तसेच त्यांच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने घ्यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. शेतीतील अनिश्चित उत्पन्न, वाढते कर्ज आणि खासगी वित्तीय संस्थांच्या वसुली पद्धतींचा प्रश्न या घटनेमुळे पुन्हा चर्चेत आला असून, संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना शासनाने वेळेत आधार देण्याची गरज व्यक्त होत आहे.

"सोशल इंजिनिअरिंग"च्या माध्यमातून रस्ते सुरक्षेचा कृतीशील संदेश!

'११ दिवसांत अवगत करा' उपक्रमांतर्गत रोडमार्क फाउंडेशन आणि एनआयटी पॉलिटेक्निक कॉलेजचा पुढाकार, फेटरी ते माहुरझरी मार्गावरील लोकसहभागातून विशेषत: विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून खड्डा दुरुस्ती, जनजागृती सह सामाजिक जबाबदारीचे भान



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर
रस्ते अपघात रोखण्यासाठी केवळ नियमांची माहिती देणे किंवा जनजागृती करणे पुरेसे नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून रस्ते सुरक्षा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. याच विचारातून रोडमार्क फाउंडेशन आणि एनआयटी पॉलिटेक्निक कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने 'सोशल इंजिनिअरिंग' उपक्रम राबविण्यात आला. '११ दिवसांत अवगत करा, रस्ते अपघातमुक्त जीवन जगण्याची कला' या अभियानांतर्गत गुरुवार, ५ नोव्हेंबर रोजी फेटरी ते माहुरझरी मार्गावरील रस्त्याच्या मधोमध पडलेला खड्डा बुजविण्यात आला. या उपक्रमातून केवळ रस्त्याची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न झाला नाही, तर सामाजिक सहभाग, सामूहिक जबाबदारी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा महत्त्वपूर्ण संदेशही देण्यात आला.
रस्त्यांवरील खड्डे ही आज सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर समस्या आहे. विशेषतः रस्त्याच्या मधोमध असलेले खड्डे या रस्त्यावर महाविद्यालय असल्यामुळे विद्यार्थ्यांची ये-जा सुरू असते त्यातही पथदिवे बंद असतात अशावेळी हे खड्डे दुचाकीस्वारांसाठी अत्यंत धोकादायक ठरतात. वेगाने येणाऱ्या वाहनचालकांना अचानक खड्डा दिसल्यास वाहनावरील नियंत्रण सुटणे, दुसऱ्या वाहनाला धडक बसणे किंवा गंभीर अपघात होण्याची शक्यता असते. अनेकदा अशा छोट्या वाटणाऱ्या त्रुटींचे रूपांतर मोठ्या अपघातात होते. त्यामुळे अपघात घडण्याची वाट न पाहता संभाव्य अपघातस्थळांची वेळीच दखल घेणे गरजेचे आहे.
कॉलेजच्या प्राध्यापिका भाग्यश्री वानखेडे यांच्या कडून प्रथम खड्ड्यांची दखल घेण्यात आली. त्यांनी अध्यक्ष राजेश वाघ यांना याची माहिती देताच रोडमार्क फाउंडेशन तर्फे तत्परतेने खड्ड्याची डागडुजी करण्यात आली. एनआयटी पॉलिटेक्निक कॉलेजच्या सहकार्याने या खड्ड्याच्या डागडुजी चा पुढाकार घेण्यात आला. रस्ते सुरक्षा ही केवळ शासनाच्या संबंधित विभागांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिक, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनीही त्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविणे आवश्यक आहे, हा विचार या उपक्रमाच्या माध्यमातून रुजविण्यात आला.
या उपक्रमात एनआयटी पॉलीटेक्निक कॉलेजचे प्राचार्य गजानन पोटभरे सर, शिक्षक मंगेश धर्मे, प्राध्यापिका भाग्यश्री वानखेडे, संपूर्ण शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. तर रोडमार्क फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश वाघ यांच्या सह अनिल वाघ, ठाणेंद्र वनवंशी, निलेश बापकर सह रोडमार्क फाउंडेशन ची संपूर्ण टीम उपस्थित होती.
यावेळी बोलताना राजेश वाघ यांनी सांगितले की, "रस्ते अपघातमुक्त समाज निर्माण करायचा असल्यास"सोशल इंजिनिअरिंग" चा अवलंब करणे गरजेचे आहे. यासाठी उपाययोजना आणि सामाजिक सहभाग महत्त्वाचा आहे. अशा समस्यांकडे दुर्लक्ष न करता त्या सोडविण्यासाठी पुढाकार घेणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे."
"रस्त्यावरील खड्ड्यामुळे अपघात होऊ शकतो, एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते, याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदार नागरिकत्वाचे संस्कार रुजविण्यास मदत होते." असे मत प्राध्यापिका भाग्यश्री वानखेडे यांनी व्यक्त केले.
"अपघात टाळण्यासाठी वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहेच, परंतु रस्त्यांची सुरक्षित स्थिती राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. रस्त्यावरील खड्डे, अडथळे आणि इतर धोकादायक बाबींकडे वेळीच लक्ष दिल्यास अनेक अपघात टाळता येऊ शकतात." असे मंगेश धर्मे यांचे म्हणणे आहे.

ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांनी सांगितलेल्या आठवणींनी रंगली 'दीपसंध्या'

'कुछ यादें कुछ नगमे' कार्यक्रमातून हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळाला उजाळा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ज्येष्ठ अभिनेत्री, पद्मश्री आणि दादासाहेब फाळके पुरस्कार विजेत्या आशा पारेख यांनी सांगितलेल्या चित्रपट कारकिर्दीतील अनेक रंजक आठवणी, हिंदी चित्रपटसृष्टीतील संगीताचा सुरेल ठेवा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा उलगडा गुरुवारी 'दीपसंध्या' या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात झाला. शिवाजी महाराज कृती समितीतर्फे शिवाजी नगर उद्यान येथे आयोजित 'कुछ यादें कुछ नगमे' या कार्यक्रमात आशा पारेख यांच्या उपस्थितीने रसिकांना हिंदी चित्रपटसृष्टीच्या सुवर्णकाळाची अनुभूती मिळाली. कार्यक्रमाला रसिकांची मोठी गर्दी झाली होती.

प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी आशा पारेख यांच्याशी साधलेल्या संवादातून त्यांच्या बालपणापासून चित्रपट कारकिर्दीपर्यंतच्या प्रवासातील अनेक आठवणी उलगडल्या. नागपूरशी असलेल्या आपल्या



जुन्या नात्याला उजाळा देताना आशा पारेख म्हणाल्या, 'माझ्या दोन मावश्या नागपूरमध्ये राहत होत्या. त्यामुळे मी आठ-नऊ वर्षांची असताना अनेकदा नागपूरला येत असे. त्यानंतरही दोन वेळा येथे येण्याचा योग आला. राजेश खन्ना यांच्या गीतांचा कार्यक्रम हा माझा नागपुरातील शेवटचा कार्यक्रम होता.'

चित्रपटांच्या चित्रीकरणातील अनुभव सांगताना त्या म्हणाल्या, 'त्या काळात रिफ्लेक्टरचा प्रकाश खूप तेजस्वी असायचा. त्यामुळे डोळ्यांना त्रास व्हायचा आणि गॉगल लावावा लागायचा. लोकांना मात्र मी मद्यपान केले आहे, असे वाटायचे.'

बालपणीच्या आठवणी सांगताना त्यांनी आपण मुलांसोबत खेळणारी 'टॉमबॉय' स्वभावाची मुलगी असल्याचे सांगितले. तसेच शम्मी कपूर यांच्यासोबतच्या आठवणी, मालवणी पद्धतीची फिश करी आणि विविध खाद्यपदार्थांविषयीच्या आवडीनिवडींवरही त्यांनी दिलखुलास गप्पा मारल्या. संगीताच्या बदलत्या स्वरूपाविषयी बोलताना आशा पारेख यांनी आजच्या गाण्यांमध्ये शास्त्रीय संगीताचा प्रभाव कमी होत असल्याची खंत व्यक्त केली. 'पूर्वीच्या गाण्यांमध्ये माधुर्य आणि अर्थ होता. संगीताची परंपरा टिकून राहिली पाहिजे,' असे सांगत त्यांनी संगीत क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या निरंजन बोबडे यांचे कौतुक केले. 'आपली कला आणि संगीत टिकून राहावे, यासाठी निरंजनसारखे कलाकार प्रयत्न करत आहेत,' असे त्या म्हणाल्या.

लता मंगेशकर यांच्या गायकीविषयी बोलताना त्यांनी, 'लताजींचे आलाप खूप कठीण असायचे. त्या सरस्वती होत्या. त्यांचे स्वर पकडणे सोपे नव्हते,' अशा शब्दांत आदर व्यक्त केला. या संवादाला सुरेल संगीताची जोड देण्यात आली. प्रसिद्ध गायक निरंजन बोबडे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या कार्यक्रमात निरंजन बोबडे आणि महेंद्र ढोले यांच्या संगीत संयोजनाखाली धनश्री देशपांडे, मंजिरी वैद्य, गौरी शिदे, मकरंद पाटणकर आणि निरंजन बोबडे यांच्यासह ३० जणांच्या चमूने विविध हिंदी चित्रपटगीतांचे सादरीकरण केले.

मकरंद पाटणकर यांनी 'श्याम मस्तानी' हे गीत सादर करून मैफलीत रंग भरला. आशा पारेख यांनी 'जिद्दी' चित्रपटातील हत्तीच्या प्रसंगाची आठवण सांगितल्यानंतर मंजिरी वैद्य यांनी 'रात का समा' हे गीत सादर केले. धनश्री देशपांडे यांनी 'सुनो सजना' या गीतातून रसिकांना मंत्रमुग्ध केले. निरंजन बोबडे यांनी 'तेरी आँखों के सिवा दुनिया में रखा क्या है' हे गीत सादर केले, तर गौरी शिदे यांनी 'ओ मेरी सोना रे सोना रे' हे गीत सादर केले. गायकांनी 'ये दुनिया वाले पूछेंगे' यासारखी युगलगीतेही सादर केली. कार्यक्रमाच्या आयोजनात शिवाजी महाराज कृती समितीचे अध्यक्ष अजय संचेती, उपाध्यक्ष संगीत चौहान व विनय अग्रवाल, सचिव श्रीकांत देशपांडे, सहसचिव अश्विन राऊत, कोषाध्यक्ष वंदना कुल्हार यांच्यासह समितीच्या सदस्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला आमदार अभिजीत वंजारी, विलास काळे, आनंद परचुरे, रवींद्र कासखेडीकर, संजय पेंडसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक प्लास्टो, सहप्रायोजक तनिष्क आणि आर. संदेश ग्रुप, तर हॉस्पिटॅलिटी पार्टनर स्प्रिंगडेल स्वीट्स होते.

पूर्वीचे शूटिंग कष्टाचे होते

चित्रपटांच्या चित्रीकरणातील कष्टदायक अनुभव सांगताना आशा पारेख यांनी तीसरी मंजिल चित्रपटातील आजा आजा या गाण्याच्या चित्रीकरणाची आठवण सांगितली. या गाण्याच्या चित्रीकरणाच्या वेळी मला एलर्जी झाली होती. दुपारी दोन वाजता शूटिंग होते. औषध दिल्यानंतरही काम करावे लागले. कलाकाराला ताप असला किंवा तब्येत ठीक नसली, तरी अनेकदा काम करावेच लागते. म्हणूनच कलाकार हा कलाकार असतो, असे त्या म्हणाल्या. पूर्वीच्या चित्रीकरणातील अडचणींवर प्रकाश टाकताना त्या म्हणाल्या, आउटडोअर शूटिंगच्या वेळी स्वच्छतागृहांची सुविधा नसायची. त्यासाठी बाहेर जावे लागायचे. दिवसभर खूप कष्ट करावे लागायचे. आता मात्र कलाकारांसाठी व्हॅनिटी व्हॅनची सुविधा उपलब्ध झाली आहे.

थोडक्यात

समर्पण फाउंडेशनच्या रजत जयंतीचा ७ नोव्हेंबरला सोहळा

२५ वर्षांपासून गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांची निःस्वार्थ सेवा; सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची प्रमुख उपस्थिती



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

रुग्ण सेवा हीच नारायण सेवा, हा विचार प्रत्यक्षात आणत समर्पण फाउंडेशन, नागपूर गेल्या २५ वर्षांपासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात येणाऱ्या गरजू रुग्णांच्या नातेवाइकांना निःशुल्क भोजन व निवासासह विविध सेवा पुरवत आहे. वर्ष २००१ मध्ये अवघ्या १०० लोकांच्या भोजन व्यवस्थेपासून सुरू झालेला हा सेवायज्ञ आज व्यापक स्वरूपात विस्तारला आहे. संस्थापक हनुमान प्रसाद राठी यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या सेवाकार्यात आज समर्पण भवनाच्या माध्यमातून गरजूंसाठी भोजन, निवास, फळे, कपडे, चप्पल, औषधे तसेच गरजेनुसार रक्त उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य केले जाते. मेडिकल चौकातील राजाबाक्षा हनुमान मंदिराजवळील सुमारे ११ हजार चौरस फुटांच्या तीन मजली समर्पण भवनातून हा उपक्रम राबविला जातो.

कोरोना काळातही संस्थेने आपली सेवा अखंडित सुरू ठेवली. या सेवाकायार्ला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त शनिवार, ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत समर्पण भवन, मेडिकल चौक येथे रजत जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूजनीय डॉ. मोहन भागवत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. नागपुरातील विविध क्षेत्रांतील सुमारे ५०० मान्यवरांनाही निमंत्रित करण्यात आले आहे.पत्रकार परिषदेत संस्थापक हनुमान प्रसाद राठी, जयप्रकाश राठी, नारायण राठी, गोविंद राठी, प्रेमप्रकाश दुबे, आनंद जोशी, चंद्रशेखर गलगलिकर आणि यतींद्र नाडकर्णी यांनी संस्थेच्या २५ वर्षांच्या सेवाकार्याची माहिती दिली. उपचारासाठी येणाऱ्या कोणत्याही गरजू रुग्णाच्या नातेवाइकाला भोजन व निवासाची चिंता भासू नये, हा संस्थेचा सेवाभावी संकल्प आहे.

अहिल्या किड्स प्री-प्रायमरी स्कूलमध्ये दिवाळी स्नेहमिलन उत्साहात!



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सरदार मल्हार होळकर बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत अहिल्या किड्स प्री-प्रायमरी स्कूल, महाजनवाडी, हिंगणा येथे दिवाळी सेलिब्रेशन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून अश्विनी उरकुडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे नर्सरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेले आकर्षक दिवे, रंगीबेरंगी आकाशकंदील आणि दिवाळीच्या विविध सजावटीच्या वस्तू हे होते. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून साकारलेल्या कलाकृतींमधून सर्जनशीलता व कलागुणांचे सुंदर दर्शन घडविले. पारंपरिक वेशभूषेतील चिमुकल्यांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. यावेळी सौ.अश्विनी उरकुडे यांनी विद्यार्थ्यांना दिवाळी सणाचे सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व समजावून सांगितले.

तसेच फटाके फोडताना घ्यावयाची काळजी, सुरक्षिततेचे नियम, मोठ्यांच्या देखरेखीखालीच फटाके हाताळण्याचे महत्त्व आणि अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची सावधगिरी याविषयी मार्गदर्शन केले. ध्वनी व वायुप्रदूषण टाळून पर्यावरणपूरक दिवाळी कशी साजरी करावी, फटाक्यांऐवजी दिवे, पणत्या आणि आनंदाची देवाणघेवाण करून सणाचा आनंद कसा वाढवावा, याचीही माहिती त्यांनी दिली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा, सर्जनशीलता, सुरक्षितता आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व शिकण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वंदना गोवणे, भावना झुंजूरकर, वैशाली राखुंडे व मंगला खांडेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. चिमुकल्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि त्यांच्या कलाकृतींमुळे संपूर्ण शाळेत आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

दिवाळीनिमित्त 'मंगल दीप संध्या'चे ६ नोव्हेंबर रोजी आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिवाळीनिमित्त संत ज्ञानेश्वर मंदिर आणि बजाजनगर नागरिक कृती समितीच्यावतीने 'मंगल दीप संध्या' या भक्तिसंगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवारी, ६ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. बजाजनगर येथील एनबीवायएस बास्केटबॉल मैदानावर सायंकाळी ६.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. सुजन ऑडिओओज प्रस्तुत या कार्यक्रमात महाराष्ट्राची परंपरा आणि मराठी-हिंदी भावभक्तीचा सुरेल संगम अनुभवता येणार आहे. कार्यक्रमाची संकल्पना प्रसिद्ध गायक अमर कुलकर्णी यांची असून गायिका डॉ. मंजिरी वैद्य अय्यर यांचा यात सहभाग आहे. आनंद मास्टे हे संगीत संयोजनाची जबाबदारी सांभाळतील. मृण्मयी कुलकर्णी आणि चैतन्य देशपांडे कार्यक्रमाचे निवेदन करतील. या विनामूल्य कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी मोठा संख्येने उपस्थित राहून आस्वाद घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

ट्रॅक्टरवर पोलिसांचा दंडुका; ट्रक-टिप्परला अभय का?

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

विनापरवाना रेती वाहतूक केल्याप्रकरणी भिवापूर पोलिसांनी बुधवारी (दि. ४) सकाळी शिवाजी लेआउट परिसरात कारवाई करीत महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टर जप्त केले. या ट्रॅक्टरमधून एक ब्रास रेतीची वाहतूक होत होती. चालकाकडे वाहतुकीचा परवाना नसल्याने चालक व मालक उमेश रामदास भलावी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, शहरातून दररोज बिनदिक्कत धावणाऱ्या रेतीच्या ट्रक आणि टिप्परवर कारवाई कधी होणार, असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे.

पोलिसांच्या गस्ती पथकाला सकाळी आठ वाजताच्या सुमारास ट्रॅक्टर क्रमांक एमएच-४०-सीएच-८४०७ विना क्रमांकाच्या ट्रॉलीतून रेती वाहून नेताना आढळले. परवान्याबाबत विचारणा केली असता चालकाकडे कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट झाले.



पंचांसमक्ष ट्रॅक्टर व रेती जप्त करण्यात आली. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ४९ तसेच मोटार वाहन कायद्यातील संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

मात्र, या कारवाईमुळे रेती वाहतुकीतील कथित दुजाभावाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. शहरातून जाणाऱ्या महामार्गावरून दररोज शेकडो ट्रक आणि टिप्परमधून रेतीची वाहतूक होत असल्याचा स्थानिकांचा आरोप आहे. या मोठ्या वाहनांवर कारवाई होताना दिसत नसताना बांधकामासाठी रेती पोहोचविणाऱ्या स्थानिक ट्रॅक्टर चालकांवरच कारवाईचा बडगा का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ट्रॅक्टरधारकांनी रॉयल्टी आणायची कुठून?

भिवापूर शहर व तालुक्यात अधिकृत रेती घाट उपलब्ध नसल्याने स्थानिक ट्रॅक्टरधारक वैनगंगेच्या परिसरातून आणलेली रेती ट्रक व टिप्परधारकांकडून खरेदी करतात आणि ग्राहकांपर्यंत पोहोचवितात, असे सांगितले जाते. त्यामुळे रेतीच्या मूळ वाहतुकीपासून किरकोळ विक्रीपर्यंतच्या साखळीतील जबाबदारी निश्चित करण्याची गरज आहे. केवळ स्थानिक ट्रॅक्टरवर कारवाई करून

रेती वाहतुकीतील कारवाईवरून दुजाभावाचा आरोप; घरकुल लाभार्थ्यांचा प्रश्न ऐरणीवर

मोठ्या वाहतूकदारांना मोकळीक दिली जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे.

विशेषतः घरकुल बांधकाम करणाऱ्या गरीब व गरजू लाभार्थ्यांसमोर रेतीचा प्रश्न गंभीर बनला आहे. नियमांची अंमलबजावणी सर्वांसाठी समान असावी; मग ट्रॅक्टर असो वा ट्रक-टिप्पर, विनापरवाना वाहतुकीवर समान कारवाई व्हावी, अशी मागणी पुढे येत आहे.

मार्गदर्शनाखाली कारवाई

वरील कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी मयंक माधव, सहायक पोलीस निरीक्षक अजितसिंग देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल गेडाम, पोलीस हवालदार वासनिक, ठाकूर व पोलीस शिपाई राहुल देविकर यांनी ही कारवाई केली. पुढील तपास पोलीस नाईक रवींद्र जाधव करीत आहेत.

प्यारे खान यांच्या नाशिक कारागृहातील भेटीची चौकशी करा!

विश्व हिंदू परिषद उमरेड जिल्ह्याचे उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना निवेदन; पदावरून हटविण्याचीही मागणी



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी संवैधानिक पदावर कार्यरत असताना नाशिक कारागृहात बॉम्बस्फोट प्रकरणातील दोषी व कुख्यात गुंड अबू सालेम याची भेट घेतल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी विश्व हिंदू परिषद, उमरेड जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात गुरुवारी दि. ५ उपविभागीय दंडाधिकारी विद्यासागर चौहान यांना निवेदन देण्यात आले. संबंधित भेटीचे नेमके कारण, त्यामागील पार्श्वभूमी तसेच संभाव्य राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित बाबींची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

प्यारे खान हे संवैधानिक पदावर कार्यरत असताना अशा प्रकारची भेट घेतल्याचे वृत्त समोर आले असल्याने या प्रकरणाची गांभीयार्ने दखल घेऊन त्यांना पदावरून तत्काळ निष्कासित करण्यात यावे, अशी मागणीही विश्व हिंदू परिषदेकडून करण्यात आली. तसेच संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी राष्ट्रीय तपास संस्था आणि केंद्रीय अन्वेषण ब्युरो यांच्यामार्फत करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या वेळी विभाग बजरंग दल संयोजक संदेश समर्थ, जिल्हा सहमंत्री नागेश भिवनकर, जिल्हा धर्मप्रसार प्रमुख अजय मोहाड, उमरेड प्रखंड मंत्री सचिन रहाटे, प्रखंड सहमंत्री शेखर रोडे, प्रखंड सत्संग प्रमुख आकाश बालपांडे आदी उपस्थित होते. प्रतिलिपी पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनाही निवेदनाची प्रत पाठविण्यात आली आहे.

दिवाळीच्या शुभपर्वावर थकबाकीमुक्तीसाठी विविध सवलती जाहीर

बिगरकृषी ग्राहकांना थकबाकीमुक्तीची संधी; उद्यापासून महावितरणची अभय योजना २०२६-२७, महावितरण अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्याहस्ते योजनेला प्रारंभ, संपूर्ण व्याज, विलंब आकार १०० टक्के माफ, एकरकमी भरणा केल्यास मूळ थकबाकीमध्ये २० टक्क्यांपर्यंत सवलत

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दिवाळीच्या शुभपर्वाचेऔचित्य साधत महावितरणने मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वीजबिलांच्या थकबाकी मुक्तीसाठी लघु व उच्चदाबाच्या कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित बिगरकृषी वीजग्राहकांसाठी महावितरणची अभय योजना २०२६-२७ जाहीर केली आहे. शुक्रवार (दि. ६ नोव्हेंबर) पासून ते १५ जानेवारी २०२७ पर्यंत या योजनेची अंमलबजावणी केली जाणार आहे.

थकबाकीमुक्तीसाठी घसघशीत सवलतींचा समावेश असणाऱ्या अभय योजनेअंतर्गत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार १०० टक्के माफ करण्यात येणार आहे. तर उर्वरित मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास त्यात आणखी २० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे. यासह मागणीनुसार पुनर्जोडणी तात्काळ मिळणार आहे.

महावितरणच्या प्रकाशगड मुख्यालयात मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक. लोकेश चंद्र यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. ५) या योजनेचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी संचालक धनंजय औंढेकर (संचालन), अनुदीप दिघे (वित्त), योगेश गडकरी (वाणिज्य), सचिन तालेवार (प्रकल्प), राजेंद्र पवार (मानव संसाधन) आदींची उपस्थिती होती.

दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या उच्च व लघुदाब वर्गवारीमधील थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित झाला आहे असे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर बिगरकृषी (शेती व सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजना वगळून) ग्राहक तसेच दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेले ग्राहक 'अभय योजना २०२६-२७' साठी पात्र आहेत. तसेच महावितरण डिस्ट्रीब्यूशन फ्रॅन्चाईजीमधील ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

या योजनेत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याजाची आणि विलंब आकाराची रक्कम १०० टक्के माफ करण्यात येईल. मूळ थकबाकीची रक्कम एकाच वेळी किंवा हप्त्यांनी भरण्याची ग्राहकांना सुविधा आहे. ही योजना सुरू झाल्यापासून १५ डिसेंबरपर्यंत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा करणाऱ्या ग्राहकांना 'अर्ली बर्ड रिबेट'चा फायदा देण्यात येईल. यात लघुदाब



घरगुती व व्यावसायिक ग्राहकांना ३ वर्षांपर्यंत वीजजोडणी कायमस्वरूपी खंडित असल्यास १० टक्के तर ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून कायमस्वरुपी खंडित असल्यास २० टक्के सवलत मिळेल. तसेच लघुदाब घरगुती व व्यावसायिक वगळून इतर सर्व लघु व उच्चदाब ग्राहकांना अनुक्रमे १० टक्के व १५ टक्के सूट मिळेल. लघुदाब ग्राहकांना ५० टक्के डाऊन पेमेंट भरून उर्वरित रकमेसाठी ६ समान व्याजमुक्त मासिक हप्ते तर उच्चदाब ग्राहकांना थकबाकीनुसार व्याजमुक्त ३ ते ६ हप्त्यांची सुविधा उपलब्ध असेल. यासोबतच मंजूर भार २० किलोवॉटपर्यंत आहे अशा ग्राहकांनी पुनर्जोडणीच्या वेळी 'प्रीपेड स्मार्ट मीटर'चा पर्याय निवडल्यास मूळ थकबाकीमध्ये अतिरिक्त ५ टक्के सवलत दिली जाईल. उल्लेखनीय म्हणजे या योजनेत सहभागी सर्व ग्राहकांसाठी पुनर्जोडणी शुल्क आणि लघुदाब ग्राहकांसाठी सर्व्हिस कनेक्शन शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत कृषी आणि सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजना वगळून इतर सर्व घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या १८३५ उच्चदाब आणि ३४ लाख ८४ हजार ५१३ लघुदाब अशा ३४ लाख ८६ हजार ग्राहकांकडे ७ हजार ६५० कोटी रुपयांची एकूण थकबाकी आहे. यातील २ हजार ९२ कोटी रुपयांचे व्याज व विलंब आकार माफ होणार आहे. तसेच दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेल्या उच्चदाबाच्या १९ आणि लघुदाबाच्या २ लाख ६० हजार ८१० अशा २ लाख ६० हजार ८२९ ग्राहकांकडे ४८८ कोटी ७८ लाख रुपयांची एकूण थकबाकी आहे. यात १६३ कोटी ९३ लाख रुपयांचे संपूर्ण व्याज माफ होणार आहे.

अभय योजना २०२६-२७ साठी अर्जाची प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. महावितरणच्या ऑनलाइन पोर्टल किंवा मोबाईल ॲपद्वारे ग्राहक अर्ज करू शकतील. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

थोडक्यात

धर्मशस्त्र पूजन कार्यक्रमात बजरंग दलाच्या नवीन दायित्वांची घोषणा



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

उमरेड बजरंग दलाच्या वतीने धर्मशस्त्र पूजन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला बजरंग दलाचे विदर्भ प्रांत सुरक्षा प्रमुख कमलजी हरियाणी हे प्रमुख अतिथी व मुख्य वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा संयोजक रुद्राजी पटले यांनी केले. कमलजी हरियाणी यांनी धर्मशस्त्र पूजनाचे महत्त्व, भारतभूमीच्या महान वीरांचा इतिहास तसेच देशातील वर्तमान परिस्थिती याबाबत मार्गदर्शन केले. राष्ट्ररक्षा, धर्मरक्षा, गौरक्षा, स्त्रीरक्षा व आत्मरक्षणासाठी युवकांनी सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले. रामटेक विभाग बजरंग दलाचे संयोजक संदेशजी समर्थ यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उमरेड जिल्ह्यातील विविध प्रखंड व खंडांमध्ये विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाच्या नवीन दायित्वांची घोषणा करण्यात आली.

उमरेड शहर व ग्रामीण प्रखंड सचिन रहाटे प्रखंड मंत्री, शेखर रोडे सहमंत्री यांची उपस्थीती होती. उमरेड ग्रामीण प्रखंड सुदर्शन शेरकी बजरंग दल संयोजक, सचिन वानखेडे सुरक्षा प्रमुख, ओम सातव गौरक्षा प्रमुख उमरेड शहरी प्रखंड अनुज समुद्रे संयोजक, रितिक घुमडे सहसंयोजक, यश तडणकर सुरक्षा प्रमुख, स्वप्नील कामडी गौरक्षा प्रमुख.उदासा खंड अर्जुन बेम्बारे - बजरंग दल संयोजक, अविनाश शर्मा - सहसंयोजक, अनिकेत मरकाम - साप्ताहिक मिलन प्रमुख, भिवापूर प्रखंड : प्रणय शेंडे - बजरंग दल संयोजक, पाचगाव खंड : बंडूजी दुधनकर - विहिप उपाध्यक्ष, याशिवाय विलासजी हुडमे यांची विहिप उमरेड जिल्हा सेवा सहप्रमुख म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली.

कार्यक्रमाला उमरेड जिल्हा मंत्री राजकुमारजी अहिरवार, सहमंत्री नागेशजी भिवणकर व गणेशजी नांदुरकर, जिल्हा सहसंयोजक खुशालजी कुबडे, धर्म प्रसार प्रमुख अजयजी मोहोड, परियोजना प्रमुख सचिनजी बेलखुडे, तसेच नागपूर महानगर बजरंग दलाचे पदाधिकारी शिवमजी लुथरा, प्रणयजी कारमोरे, आयुषजी जामकर व शिवमजी पांडे यांच्यासह उमरेड जिल्ह्यातील विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अखेर भारतमातेची आरती व जयघोषाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

ज्येष्ठ नागरिकांचा सामूहिक अमृत महोत्सव व सहस्रचंद्र दर्शन सोहळा ७ नोव्हेंबर रोजी

७० व ८० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठांचा होणार सन्मान

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनप्रवासाचा गौरव करण्यासाठी सनातन सांस्कृतिक कला व क्रीडा परिषद आणि ज्येष्ठ नागरिक महामंडळ विदर्भ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांचा सामूहिक अमृत महोत्सव व सहस्रचंद्र दर्शन सोहळा शनिवारी, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता रेशीमबाग बगीचा येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात ७० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा अमृत महोत्सव, तर ८० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सहस्रचंद्र दर्शन संस्कार करण्यात येणार आहे. धार्मिक विधी, मंत्रोच्चार आणि विधिवत संस्कारांच्या माध्यमातून हा सोहळा पार पडेल. श्री व सौ. दांपत्यांनाही पूजा व विधीमध्ये सहभागी होता येणार आहे.

काही अपरिहार्य कारणांमुळे ज्येष्ठ नागरिकांचा अमृत महोत्सव किंवा सहस्रचंद्र दर्शन संस्कार राहून गेले असतील, अशा ज्येष्ठांसाठी हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी ८०८७३७९३६८ आणि ९६२३७६४६६२ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

पाटणसावंगी भूमिगत कोळसा खाणीत दुर्घटना, बेल्टमध्ये दबून कामगाराचा मृत्यू

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

तालुक्यातील पाटणसावंगी येथील डब्लूसीएलच्या भूमिगत कोळसा खाणीत काम करत असताना बेल्टमध्ये दबून एका ३६ वर्षीय कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी सुमारे ११.३० वाजताच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे पाटणसावंगी वेकोली परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. जगदीश सुरेश आसुटकर (वय ३६ वर्षे) असे मृतक कामगाराचे नाव असून ते मूळचे चरूरखटी, तालुका वरोरा, जिल्हा चंद्रपूर येथील रहिवासी होते.



सध्या ते पाटणसावंगी येथील हउछ कॉलनी, सद्भावना नगर येथे वास्तव्यास होते. जगदीश आसुटकर यांच्या गावातील जमीन हउछ प्रकल्पासाठी संपादित झाल्यामुळे त्यांना डब्लूसीएलमध्ये नोकरी मिळाली होती. व ते पाटणसावंगी येथे अडीच वर्षांपासून कार्यरत होते.

आज सकाळी भूमिगत कोळसा खाणीत कर्तव्यावर असताना काम करत असताना ते बेल्टमध्ये दबले गेले. या भीषण दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला. सहयोगी कामगारांच्या मदतीने त्यांना वर काढण्यात आले. घटनेनंतर मृतदेह पंचनामा प्रक्रियेसाठी हउछ वलनी हॉस्पिटल येथे ठेवण्यात आला आहे. यावेळी हउछ चे वरिष्ठ अधिकारी तसेच मृत कामगाराचे कुटुंबीय हॉस्पिटलमध्ये उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन लहान मुली असा परिवार आहे. पत्नी व मुली पाटणसावंगी येथील हउछ कॉलनीत वास्तव्यास होत्या, तर उर्वरित कुटुंबीय मूळगावी राहतात. या दुर्दैवी घटनेमुळे आसुटकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून वेकोली पाटणसावंगी परिसरात शोककळा पसरली आहे. एका तरुण कामगाराचा अशा प्रकारे झालेला मृत्यू कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणणारा ठरला आहे.

'दृष्टांत' एकांकिका प्रथम, 'ओमेगा' द्वितीय

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूरच्या वतीने आयोजित नाट्यतपस्वी राम जाधव स्मृती करंडक विदर्भस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धेत 'दृष्टांत' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावला. 'ओमेगा'ला द्वितीय, तर 'द रोड शो'ला तृतीय क्रमांक मिळाला.

गुरुवारी या स्पर्धेची अंतिम फेरी पार पडली. सकाळी ११ वाजेपासून सायंकाळ पर्यंत झालेल्या या अंतिम फेरीत एकूण सात एकांकिका सादर करण्यात आल्या. या स्पर्धेचे परीक्षण रमेश लखमापुरे, मृणाल पुराणिक आणि वंदना जिवने यांनी केले. अंतिम फेरीनंतर झालेल्या पारितोषिक वितरण सोहळा



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गिरीश गांधी होते. प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री परशुराम खुणे, तर विशेष अतिथी म्हणून हरीश इथापे उपस्थित होते. यावेळी विदर्भ साहित्य संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, पराग घोंगे आणि आसावरी तिडके-गडेकर यांचीही उपस्थिती होती. विजेत्यांना पारितोषिक वितरित करण्यात आले.

लेखन विभागात निरंजन मार्कंडेयवार यांना 'द रोड शो'साठी प्रथम, अभय नवाथे यांना 'दृष्टांत'साठी द्वितीय, तर चंद्रकांत चौधरी यांना 'ओमेगा'साठी तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात आले. स्पर्धेत बक्षीस मिळण्यापेक्षा कलावंताला आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये कला दडलेली असते आणि रंगभूमीच्या माध्यमातून ती प्रकट होते. त्यामुळे कलावंताच्या पाठीवर कौतुकाची थाप आणि प्रोत्साहनाचा हात असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी पद्मश्री परशुराम खुणे यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गिरीश गांधी यांनी झाडीपट्टी रंगभूमीच्या योगदानावर प्रकाश टाकला. नागपूरमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेमुळे कलावंतांना उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाल्याचे त्यांनी सांगितले. हरीश इथापे यांनी रंगभूमी ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून माणसांच्या मनाची मशागत करणारी आणि समाज घडवणारी सृजनभूमी असल्याचे सांगितले. परीक्षक रमेश लखमापुरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकात पराग घोंगे यांनी नागपूर आणि विदभार्तील रंगकर्मीच्या जडणघडणीत या स्पधेर्चे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभदा फडणवीस यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. पराग घोंगे यांनी केले. यावेळी अरुणा सबाने, स्वाती मोहरीर, अनिल इंदाणे, प्रमोद भुसारी, नरेश गडेकर, नरेश शिंदे, देवेंद्र लुटे, विष्णू निंबाळकर आणि माधुरी साकुळकर उपस्थित होते.

राम जाधव स्मृती करंडक एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण थाटात

मेडिकल स्टोअर्सचे कुलूप तोडून औषधांसह लाखोंचा माल रस्त्यावर

मध्यरात्रीच्या धक्कादायक प्रकाराने उमरेडमधील औषध विक्रेत्यांमध्ये भीती; घरमालकावरही कायदेशीर कारवाईची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

उमरेड शहरातील इतवारी पेठ परिसरात एका मेडिकल स्टोअर्सचे कुलूप तोडून दुकानातील औषधे, संगणक साहित्य, फर्निचर व इतर साहित्य बाहेर फेकून नुकसान केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शहरातील औषध विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रकरणातील आरोपींसह संबंधित घरमालकाची भूमिकाही तपासून दोषी आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, इतवारी पेठ येथील मेडिकल स्टोअर्सचे दुकान रात्री सुमारे ९.३० वाजता बंद करून दुकानाला कुलूप लावण्यात आले होते. त्यानंतर रात्री सुमारे ११.४५ वाजता फिर्यादीस दूरध्वनीवरून दुकानातील सामान बाहेर फेकले जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर फिर्यादी घटनास्थळी पोहोचले असता



मेडिकल स्टोअर्ससमोर नागरिकांची गर्दी झालेली दिसली. दुकानातील फ्रीज, संगणक साहित्य, फर्निचर तसेच औषधांचा साठा दुकानाबाहेर फेकण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

तक्रारीनुसार, संदीप ऊर्फ डेजो समुद्रे याने दुकानाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला व दुकानातील साहित्य बाहेर फेकून नुकसान केले. तक्रारीत नमूद केलेल्या साहित्यामध्ये सुमारे २० हजार रुपयांचा फ्रीज, अंदाजे ३० हजार रुपयांचे संगणक साहित्य, सुमारे ४ लाख रुपयांचे फर्निचर तसेच अंदाजे ३५ लाख रुपयांचा औषधसाठा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशाप्रकारे एकूण सुमारे ४० लाख ५० हजार रुपयांच्या मालाचे नुकसान झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. आरोपी संदीप ऊर्फ डेजो समुद्रे, वय ३९ वर्षे, रा. इतवारी पेठ, उमरेड याचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्यात आल्याचे तक्रारीतील माहितीत नमूद आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेर्शांचे पालन करून आरोपीवर कायदेशीर अटकेची कारवाई करण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, दुकान भाडेतत्त्वावर असल्यास भाडेकरूला कायदेशीर प्रक्रियेविना दुकानातून बाहेर काढणे, कुलूप तोडणे अथवा दुकानातील मालमत्तेचे नुकसान करणे हा गंभीर प्रकार ठरू शकतो. त्यामुळे या घटनेत घरमालकाची नेमकी भूमिका काय होती, दुकान खाली करण्यासाठी कोणाकडून दबाव किंवा परवानगी देण्यात आली होती का, तसेच संबंधित व्यक्तींशी घरमालकाचा काही संबंध होता का, याची पोलिसांनी सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

कायद्याची प्रक्रिया हातात घेऊन कोणालाही दुकानाचे कुलूप तोडण्याचा किंवा लाखो रुपयांच्या औषधसाठ्याचे नुकसान करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्या आरोपींसह संबंधित घरमालकावरही कायद्यानुसार योग्य ती कठोर कारवाई करावी, अशी मागणी मेडिकल व्यावसायिकांकडून होत आहे. या घटनेमुळे शहरातील मेडिकल स्टोअर्स चालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी पोलिसांनी ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

कृषि विकास योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी अनुदान, प्रती थेंब अधिक पिक

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कृषि विभागामार्फत जिल्ह्यात राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रती थेंब अधिक पिक सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येत आहे.



योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचन या बाबीखाली तुषार संच, ठिबक संच, रेनगन, सेमी परमनंट इरिगेशन सिस्टीमचा समावेश आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या योजनेची माहिती व लाभ मिळावा यासाठी सदर योजनेची प्रचार व प्रसिद्धी तालुकास्तरावर करण्यात येत आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या प्रवर्गातील लाभार्थ्यांकरीता ही विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

इच्छूक शेतकऱ्यांनी आपले फार्मर आयडी, सातबारा, नमुना ८ अ, जातीचा दाखला, आधार क्रमांकला लिंक केलेले मोबाईल क्रमांक, बँक पासबुकसह आपल्या तालुक्यातील ग्राहक सेवा केंद्र, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी कार्यालयाशी किंवा उपकृषि अधिकारी व सहाय्यक कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे. शेतकरी https://mahadbtmahait.gov.in/Farmer या लिंकवर जाऊन सुद्धा अर्ज करून शकतात.

योजनेचे स्वरूप व मिळणारे अनुदान

योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांच्या समन्वयातून ९० टक्के पर्यंत अनुदान देण्यात येतात.

अनुदानाची विभागणी

केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी ५५ टक्के इतर शेतकरी यांना ४५ टक्के अनुदान दिले जाते. राज्य पुरस्कृत योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक २५ टक्के तर इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान देण्यात येते. विशेष घटक योजनेअंतर्गत उर्वरित १० टक्के ते १५ टक्के अतिरिक्त अनुदान दिले जाते.

हरित ऊर्जेतील महाराष्ट्राच्या प्रयत्नांना राष्ट्रीय पातळीवर मान्यता; शिखर परिषदेत उपराष्ट्रपतींच्या हस्ते महाराष्ट्राला पुरस्कार

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सात आयामी दृष्टीकोनातून महाराष्ट्राने केलेल्या प्रयत्नांना राष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय आणि पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन यांच्या मूल्यांकन अहवालानुसार 'रिन्युएबल एनर्जी स्टेट असेसमेंट फ्रेमवर्क' अंतर्गत भारतामध्ये हरित ऊर्जेच्या निर्मिती आणि विकासात महाराष्ट्र राज्याला देशातील राज्यांमध्ये द्वितीय स्थान मिळाले आहे.

नवी दिल्ली येथील भारत मंडपम येथे आयोजित 'भारत नवीकरणीय ऊर्जा शिखर परिषद व प्रदर्शन २०२६' च्या समारोप सोहळ्यात गुरुवारी (दि. ५) उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्याहस्ते ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आणि अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना पुरस्कार प्रदान करून महाराष्ट्राचा गौरव करण्यात आला. यावेळी केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी व राज्यमंत्री श्रीपाद



नाईक यांची प्रमुख उपस्थिती होती.

सात-आयामी सुधारणांमुळे बदल - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ, ऊर्जा-सुरक्षित आणि स्वावलंबी भारताच्या संकल्पनेला अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने ऊर्जा क्षेत्राच्या बदलासाठी सात-आयामी दृष्टिकोन स्वीकारला आहे. या दृष्टिकोनामध्ये अक्षय ऊर्जा निर्मितीचा विस्तार, विकेंद्रित प्रकल्पांद्वारे कृषी क्षेत्राचे सक्षमीकरण, पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, स्मार्ट मीटरिंगद्वारे डिजिटल रूपांतरण, धोरणात्मक सुधारणा, ऊर्जा साठवणुकीस प्रोत्साहन आणि परवडणाऱ्या वीज सेवांची उपलब्धता सुधारणे या सात परस्परसंबंधित घटकांचा समावेश आहे. या उपायांमुळे राज्यातील वीज निर्मिती, वितरण आणि वापराच्या पद्धतीमध्ये सकारात्मक बदल घडत आहे. महाराष्ट्राने हरित ऊर्जा विकासाला गती देण्यासाठी आणि वीज क्षेत्रात व्यापक सुधारणा करण्यासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित देखील आता दिसू लागले आहेत.

महाराष्ट्राच्या कृषी सौरऊर्जा मॉडेलने वेधले देशाचे लक्षः

महाराष्ट्राच्या ऊर्जा रणनीतीचे एक प्रमुख वैशिष्ट्य असलेल्या व सौरक्रांतीचे माध्यम बनलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० द्वारे कृषी वीजवाहिन्यांचे सौरऊर्जीकरण करण्यासाठी उपकेंद्रांजवळ विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांच्या दिवसा व शाश्वत वीजपुरवठ्याचे स्वप्न साकार झाले आहे. या योजनेतून १६ हजार मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रीत प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर असून त्यातील सुमारे ७ हजार मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. त्याची फलनिष्पत्ती म्हणजे सध्या ४ हजार ५०० हून अधिक कृषी वीजवाहिन्या आणि १,२०० उपकेंद्रांच्या सौरऊर्जीकरणामुळे १८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरु झाला आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी'एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड' या स्वतंत्र कंपनीची स्थापना करण्यात आली असून, महाराष्ट्राचे हे फिडर-स्तरीय मॉडेल इतर राज्यांसाठीही मार्गदर्शक ठरत आहे.

कृषी आणि घरगुती क्षेत्रात सौर उपक्रमांचा विस्तारः

यासोबतच, पीएम-कुसूम (घटक ब) आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे सौर ऊर्जेच्या माध्यमातीन सिंचन क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. महाराष्ट्रात आतापर्यंत सुमारे १२ लाख ऑफ-ग्रिड सौर कृषी पंप बसवण्यात आले असून, हे प्रमाण देशातील एकूण स्थापनेच्या ६५ टक्के आहे. अवघ्या ३० दिवसांत ४५,९११ कार्यरत सौर पंप बसवून महावितरणने 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्येही नोंद केली आहे. तसेच पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत छतावरील सौरऊर्जा वापरामध्ये राज्याने देशात दुसरा क्रमांक मिळवला आहे. या योजनेत महावितरणची एकूण छतावरील सौर प्रकल्पांची क्षमता ७ हजार १०० मेगावॅटपेक्षा अधिक झाली आहे. याशिवाय १७ गावांना पूर्णपणे सौरऊर्जेवर आणणारी 'सौर ग्राम योजना' आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी 'स्मार्ट' योजना यासारख्या उपक्रमांतून हरित व स्वच्छ ऊर्जेचा फायदा शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे दिला जात आहे.

ऊर्जा विभागाचे नेतृत्व आणि संस्थात्मक समन्वयः

राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांच्या प्रशासकीय नेतृत्वाखाली ऊर्जा विभागाने ही उत्तुंग कामगिरी केली आहे. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्यासह महाऊर्जा, महानिर्मिती आणि महापारेषण यासारख्या संस्थांच्या समन्वयामुळे राज्य सरकारची ध्येयधोरणे प्रत्यक्ष अंमलबजावणीत यशस्वी ठरत आहेत. हा पुरस्कार म्हणजे राज्यातील राजकीय नेतृत्व, प्रशासकीय यंत्रणा, अभियंते आणि कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे. सोबतच भारताच्या स्वच्छ ऊर्जा क्रांतीमधील महाराष्ट्राचे योगदान देखील अधिक अधोरेखित झाले आहे.

धूळपेरणीच्या माध्यमातून ग्रामीण भागात वाचन चळवळीची मशागत !

साहित्यिक सचिन बेंडभर पाटील यांचे गौरवोद्गार

दै. सिंहवाणी वृत्त, पुणे

धूळपेरणी दिवाळी अंक म्हणजे मराठी साहित्यविश्वाची एक अनमोल सांस्कृतिक ठेव आहे. त्याने ग्रामीण भागातील वाचन चळवळीला गती दिली आहे. साहित्य आणि संस्कृती जपण्याचे काम हा दिवाळी अंक गेली अनेक वर्षापासून करत आहे, अशा शब्दात साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांनी धूळपेरणी दिवाळी अंकाचे प्रकाशन करताना करताना गौरवोद्गार काढले. यावेळी प्राचार्य संजीव मांढरे, शिरूर बालकुमार शाखेचे अध्यक्ष राहुल चातूर आणि धूळपेरणी दिवाळी अंकाचे सहसंपादक प्रा. कुंडलिक कदम व्यासपीठावर उपस्थित होते.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शिरूर ग्रामीण व अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था शाखा शिरूर यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात सृष्टी प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या



धूळपेरणी या दिवाळी अंकाचे प्रकाशन साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर यांच्या हस्ते शिक्रापूर येथील चव्हाण कॉम्प्लेक्स येथे करण्यात आले.

यावेळी बोलताना बेंडभर म्हणाले, महाराष्ट्राला दिवाळी अंकाची जुनी परंपरा लाभली आहे. ग्रामीण भागातही आता दर्जेदार दिवाळी अंक प्रकाशित होत आहेत.

यातून नवीन लेखक कवी उदयास येत आहे. ही गोष्ट मराठी साहित्याच्या दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची आहे. या दिवाळी अंकांना चांगला वाचक वर्ग मिळत आहे. ग्रामीण भागातील लोक कामातून सवड काढून दिवाळी अंक आवर्जून वाचत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात वाचन चळवळ विकसित झाली आहे. हल्लीच्या काळी डिजिटल अंकही मोबाईलवर उपलब्ध होत आहे. त्यामुळे वाचकांच्या पसंतीनुसार दिवाळी अंकांना मागणी वाढत आहे. बदलता वाचक वर्ग पाहून लेखक व प्रकाशकांनी साहित्य प्रांतात केलेला हा बदल खरोखरच कौतुकास्पद आहे.

यावेळी कार्यक्रमाला शिरूर बालकुमार साहित्य संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. गुरुनाथ पाटील, निरगुडसर गावचे पोलीस पाटील व स्तंभलेखक विठ्ठल वळसे पाटील, प्रा. नानासाहेब गावडे, माजी मुख्याध्यापक केशव पवार, इन्फिनिटी क्लासेसचे संचालक प्रा. अमोल चांदणे, सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव भारत खोमणे आणि पत्रकार संतोष शेंडकर आदी मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुंडलिक कदम यांनी केले. तर प्रा. गुरुनाथ पाटील यांनी आभार मानले.

थोडक्यात

थकीत कर्जदारांसाठी एकरकमी परतावा योजना, व्याजात ५० टक्के सवलत

३१ मार्च २०२७ पर्यंत योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत थकीत कर्जदारांसाठी एकरकमी परतावा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी संपूर्ण कर्जाची रक्कम एकरकमी परतफेड केल्यास थकीत व्याजाच्या रक्कमेत ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. ही योजना ३१ मार्च २०२७ पर्यंत सुरू राहणार आहे. महामंडळाकडून कर्ज घेतलेल्या ज्या लाभार्थ्यांकडे कर्जाची परतफेड थकीत आहे, त्यांनी या योजनेचा लाभ घेऊन व्याजातील सवलतीचा फायदा घ्यावा आणि आपले कर्ज खाते निकाली काढावे. जास्तीत जास्त थकीत कर्जदारांनी या संधीचा लाभ घेऊन कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक सुशांत बेझलवार यांनी केले आहे.

स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती, नवबौद्ध उद्योजकांना १५ टक्के मार्जिन मनी

प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांना उद्योग उभारणीसाठी मार्जिन मनी उपलब्ध करून देण्याच्या योजनेची व्याप्ती वाढवून निकषांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्प मूल्याच्या १५ टक्के मार्जिन मनी लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकेने प्रकल्प मूल्याच्या किमान ७५ टक्के कर्ज वितरित करणे आणि लाभार्थ्याने किमान १० टक्के स्वहिस्सा भरणे आवश्यक आहे. मंजूर मार्जिन मनीची रक्कम थेट लाभार्थ्याच्या कर्ज खात्यात जमा करण्यात येईल. या रकमेचा वापर केवळ मंजूर प्रकल्पाच्या मुदत कर्ज व खेळत्या भागभांडवलासाठी करणे बंधनकारक आहे.

योजनेच्या लाभासाठी अर्जदाराने यापूर्वी उद्योग सुरू करण्यासाठी शासनाच्या अन्य योजनांचा लाभ घेतलेला नसावा. तसेच आवश्यक कागदपत्रे, बँकेचे शिफारसपत्र आणि ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवरील सत्यतेचे शपथपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी सर्व अटी व शर्तींची पूर्तता करून मार्जिन मनीचे प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, बी-विंग, सामाजिक न्याय भवन, शासकीय आयटीआयसमोर, श्रद्धानंदपेठ, नागपूर येथे सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बीएससी-पीएमटी अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

विद्यार्थ्यांनी १८ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करावे

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, (जीएमसी) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बॅचलर ऑफ सायन्स इन पॅरामेडिकल तंत्रज्ञान (बीएससी-पीएमटी) पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांना १८ नोव्हेंबर २०२६ पर्यंत प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहून अर्ज सादर करावे. हा अभ्यासक्रम तीन वर्षे शैक्षणिक कालावधी आणि एक वर्षाची आंतरवासिता (इंटर्नशिप) असा एकूण चार वर्षांचा आहे. यामध्ये रेडिओग्राफी, रेडिओथेरपी, ऑपरेशन थिएटर, लॅबोरेटरी, फॉरेन्सिक सायन्स, परफ्युजनिस्ट, कार्डिओलॉजी, ऑप्टोमेट्री, एंडोस्कोपी, ब्लड ट्रान्सफ्युजन, कम्युनिटी मेडिसिन आणि इमर्जन्सी मेडिकल सर्व्हिसेस या १२ महत्त्वाच्या विषयांचा समावेश आहे.

पात्रता व आवश्यक कागदपत्रे

उमेदवार भारतीय नागरिक आणि महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असून जन्म ३१ डिसेंबर २००९ पूर्वी झालेला असावा. त्याने महाराष्ट्र राज्यातील संस्थांमधून १० वी व १२ वी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण असावा. अर्जासोबत भारतीय नागरिकत्व दाखला, अधिवास प्रमाणपत्र, १० वी व १२ वी गुणपत्रिका, वैद्यकीय प्रमाणपत्र, प्रयत्न प्रमाणपत्र आणि ३१ मार्च २०२७ पर्यंत वैध असलेले जात, जात वैधता,नॉन-क्रिमिलेयर (VJ, NT-1, NT-2, NT-3, OBC, SBC) किंवा एहर प्रमाणपत्र या छायांकित प्रती जोडणे अनिवार्य आहे.

प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

दि ९ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर २०२६ पर्यंत अर्ज विक्री व स्वीकारण्यात येतील. दि २३ नोव्हेंबर रोजी गुणवत्ता यादी व दि. २५ नोव्हेंबरपर्यंत अंतिम गुणवत्ता यादी व प्रथम निवड यादी लावण्यात येईल. दि २५ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबरपर्यंत प्रवेश घेण्याची मुदत असून विद्यार्थ्यांनी जीएमसी नागपूरच्या www.gmcnagpur.org या अधिकृत संकेतस्थळावरून अर्जाचा नमुना व माहिती पुस्तिका प्राप्त करावी. आपला अर्ज, आवश्यक कागदपत्रे महाविद्यालयात प्रत्यक्ष जमा करावी. प्रवेशाबाबतचे सर्व नियम राज्य शासन व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या मानकानुसार राहतील. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी केले आहे.

मोकाट कुत्र्याच्या हल्ल्यात महिला सफाई कर्मचारी गंभीर जखमी

पाथरी : पाथरी शहरात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट वाढला आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नगरपरिषद कार्यक्षेत्रातील प्रभाग ९ मधील कंत्राटी महिला सफाई कामगार भागुबाई कांबळे यांच्यावर दि. ४ नोव्हेंबर रोजी मोकाट कुत्र्याने अचानक हल्ला करत चावा घेतला. या घटनेमुळे महिला कर्मचारी गंभीर जखमी झाली असून उपचारार्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये घबराहट पसरली असून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार दि. ४ नोव्हेंबर रोजी नगरपरिषद महिला सफाई कर्मचारी भागुबाई कांबळे नेहमीप्रमाणे प्रभाग ९मध्ये सफाईचे काम करत होत्या. यावेळी मोकाट कुत्र्याने त्यांच्यावर अचानक हल्ला करत गंभीर जखमी केले. कुत्र्याच्या हल्ल्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी पाथरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

८.१४० किलोग्रॅम अंमलीपदार्थ गांजा २ लाख ६ हजारांचा मुद्देमाल जप्त

आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक नागपुर ग्रामीण पोलिसांची कामगिरी

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर



तालुक्यातील पोलीस स्टेशन केळवद हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि सागर खर्डे, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक नागपुर ग्रामीण आणि केळवद पोलीसांनी संयुक्त कारवाई करत दिनांक ०४/११/२०२६ रोजी अवैध गांजा साठवणुक विकी तसेच लागवड करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंदवुन ८.१४० किलोग्रॅम गांजा जप्त केला.

दिनांक ०४/११/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे सावनेर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली की, तेलंगखेडी गावात एक इमस नामे बंडू कृष्णाजी क्षीरसागर हा त्याच्या राहत्या घरी अंमली पदार्थ गांजाची साठवणूक व विक्री करत आहे. नमुद पथकाने मिळालेल्या माहीतीच्या आधारे सापळा रचुन केळवद ठाणेदार आशिषसिंग ठाकूर व पोलीसांसह संयुक्त कारवाई करत आरोपी नामे बंडू कृष्णाजी क्षीरसागर, वय ६४ वर्ष, रा.णार तेलंगखेडी, ता. सावनेर, जि. नागपूर याचे घराची घरझडती घेतली असता अंमली पदार्थ गांजा मिळुन आला.

आरोपीचे घरी ५.०८८ किलोग्रॅम गांजा मिळून आला व आरोपीस अंमली पदार्थ गांजाबाबत अधिक विचारपूस केली असता आरोपीने त्याच्या तेलंगखेडी शिवारातील शेतात गांजाच्या झाडाची लागवड केल्याची माहिती दिल्याने नमुद त्याचे शेतामध्ये जाऊन पाहणी केली असता गांजाचे दोन झाडाची लागवड केले असल्याचे दिसून आले.

पोलीसांनी १) घरातुन जप्त केलेला हिरवे पाने फुले बिया व बोंड असलेला गांजा ५.०८८ किलोग्रॅम किंमती १,२७,२००/- रुपए, २) दोन गांजाची झाडे वजन ३.०५२ किलोग्रॅम किंमती ७६,३००/- रुपए ३) एक कीपॅड मोबाईल किंमती २५००/- रुपए ४) एक चिनी मातीची चिलम किंमती ५०/- रुपये आणि इतर साहित्य असा एकुण २,०६,१३०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे कलम ८ (क), २० (ब) (ii) एन.डि.पि.एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आले आहे.

वाहनांवरील पांढऱ्या एलईडी लाईट विरोधात आंदोलनाचा इशारा

ताडकळस : सध्या मोठ्या प्रमाणात वाहनांवर बसविण्यात येणाऱ्या प्रखर पांढऱ्या एलईडी लाईटमुळे रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनचालकांना प्रखर प्रकाशाच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या प्रखर प्रकाशामुळे अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहनांवरील पांढऱ्या एलईडी लाईटचा वापर पूर्णपणे बंद करण्यात यावा. तसेच संबंधित विभागाने अशा वाहनांची तपासणी करून नियमबा पांढऱ्या एलईडी लाईटचा वापर करणाऱ्यावर वाहन चालकांवर कठोर कारवाई करावी. अन्यथा या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेच्या वतीने मनसे स्टाईलने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यासंदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेचे परभणी जिल्हाध्यक्ष नाना तुपे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले आहे.

वीज कंपन्या मधील ८६००० कर्मचाऱ्यांना २०००० सानुग्रह अनुदान दिवाळीपूर्वी देणार

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेच्यावतीने देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व ऊजार्मंत्री यांना ८६००० वीज कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी रु.२५,००० सानुग्रह अनुदान/ बोनस जाहीर करावा ही मागणी लेखी पत्राद्वारे केली होती. महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी,अभियंते,अधिकारी कृती समिती १८ संघटनाच्या वतीने लेखी पत्राद्वारे बोनसची मागणी मुख्यमंत्र्याकडे यांच्याकडे केली होती. महावितरण कंपनीस सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांमध्ये रू.१२३४.१६ कोटी, महानिर्मिती कंपनीस ४५१.९८ तर महापारेषण कंपनीस रु.२४३८ कोटी नफा झालेला आहे.

महावितरण कंपनीने महसुलामध्ये अतिशय चांगली प्रगती केलेली आहे. वीज ग्राहकांना सर्वोत्तम सेवा, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कामगार व वीज ग्राहकास प्रशिक्षित करून अपघात कमी करण्याकरिता केलेल्या उपाययोजना,राज्यातील शेतकऱ्यांना सोलर कृषी पंप योजना राबवून वीजपुरवठा केल्याबद्दल वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झालेली आहे. तिन्ही वीज कंपन्याना आंतरराष्ट्रीय,राष्ट्रीय व राज्य पातळीवरील अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहे.वरील लक्ष गाठण्याकरिता तिन्ही वीज कंपन्या मधील कर्मचारी, अभियंते, अधिकारी, सहाय्यक व कंत्राटी कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतलेले आहे.

कामगार संघटनांच्या मागणीनतंर तिन्ही वीज कंपन्यातील कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस देण्याबाबतचा प्रस्ताव वीज कंपन्यांच्या व्यवस्थापनाच्या वतीने अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक निर्मिती,वितरण व पारेषण यांना सादर केला होता. त्यांनी मान्यता प्रदान केल्यानंतर अप्पर मुख्य सचिव ऊर्जा यांच्या मान्यतेस शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला. अपर मुख्य सचिव ऊर्जा यांनी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री यांच्या बरोबर विचार करून कर्मचारी, अभियंते,अधिकारी यांना रु.२००००/-तर विद्युत सहाय्यक व इतर कर्मचारी यांना रु.१४,०००/-सानुग्रह अनुदान /बोनस जाहीर केलेला आहे. याबाबतचे माहिती वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष कॉम्रेड मोहन शर्मा व सरचिटणीस कॉम्रेड कृष्णा भोयर यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकाद्वारे केलेली आहे.

सम्राट अशोक बुद्ध विहारात वर्षावासाची मंगलमय सांगता

भंते अनिरुद्ध यांच्या उपस्थितीत बुद्धवंदना, चिवरदान व धम्मदेसना

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



काशी नगर येथील सम्राट अशोक बुद्ध विहारात मंगळवारी वर्षावास समाप्तीनिमित्त विविध धार्मिक व धम्मविषयक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० वाजता भंते अनिरुद्ध आणि त्यांच्या भिक्खू संघाचे विहारात आगमन झाले. त्यांच्या उपस्थितीत बुद्धवंदना, चिवरदान, फलदान, धम्मदान तसेच धम्मदेसना असे कार्यक्रम पार पडले.

संपूर्ण परिसरात यावेळी मंगलमय आणि धम्ममय वातावरण निर्माण झाले होते. वर्षावासाच्या कालावधीत बुद्ध विहारात मोलाचे मार्गदर्शन करणारे देवानंद वानखडे यांचा विहार समितीतर्फे शाल, पुष्पगुच्छ आणि धम्मदान देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी वानखडे यांनी उपस्थित उपासक-उपासिकांना मार्गदर्शन केले. भंते अनिरुद्ध यांनीही धम्मविचारांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन संस्थेचे अध्यक्ष भीमराव मगरे यांनी केले.

आयोजनासाठी विहार समितीचे कोषाध्यक्ष पुणबाजी शंभरकर, मधुकर मून, लंकेश गोंडणे, शेखर जीवणे, ढाकणे सर, खडतकर सर, गोटेकर सर, कांबळे सर, विनोद नरनावरे, हुमणे, दुपारे ताई, बोरकर मॅडम, सुनीता मगरे, प्रियांका कांबळे, शिला गाजरे, रजनी पाटील, ज्योती झोडापे, पूर्णिमा मस्के, वंदना कांबळे, सुनीता नगराळे, निशा गायकवाड, प्रज्ञा जवादे, धाबर्डे ताई, रामटेके ताई, सत्यपाला शामकुवर, वनिता टेम्भूरे, नारायणे ताई, अबुलकर मॅडम, नारंजे मॅडम यांच्यासह वस्तीतील उपासक-उपासिकांनी सहकार्य केले. दुपारी १२.३० वाजता भोजनदानाला सुरुवात झाली. सायंकाळी ४ वाजेपर्यंत नागरिकांनी भोजनाचा लाभ घेतला. उपासक-उपासिकांच्या उत्स्फूर्त सहभागात आणि मंगलमय वातावरणात वर्षावास समाप्ती कार्यक्रमाची सांगता झाली.

कळमेश्वरमध्ये 'चैतन्य चिल्ड्रन्स क्लिनिक'चे दिमाखदार उद्घाटन

स्वामी ब्रह्मचैतन्यजी यांच्या दिव्य सान्निध्यात मान्यवरांची उपस्थिती, बालआरोग्य सेवेसाठी आधुनिक वैद्यकीय सुविधांची नवी सुरुवात

दै. सिंहवाणी वृत्त, कळमेश्वर



कळमेश्वर व परिसरातील बालकांना दर्जेदार, आधुनिक आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या 'चैतन्य चिल्ड्रन्स क्लिनिक'चा शुभारंभ नुकताच शिवाजी कॉम्प्लेक्स, शिवाजी चौक, कळमेश्वर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. परमपूज्य स्वामी ब्रह्मचैतन्यजी यांच्या शुभाशीवार्दाने व दिव्य सान्निध्यात पार पडलेल्या या उद्घाटन सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

या सोहळ्याला महाराष्ट्र विधान परिषदेचे आमदार डॉ. राजीव पोतदार, कळमेश्वर नगर परिषदेचे अध्यक्ष विनाश माकोडे, उपाध्यक्ष धनराज देवके, नगर परिषद सदस्य सवितातार्ई सुनील नाथे तसेच प्रसिद्ध उद्योजक सुनील नाथे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे स्वागत करत कळमेश्वरसारख्या शहरात विशेष बालरोग आरोग्यसेवा उपलब्ध होणे ही निश्चितच समाधानकारक आणि समाजहिताची बाब असल्याचे प्रतिपादन केले.

आमदार डॉ. राजीव पोतदार यांनी स्थानिक पातळीवर दजेर्दार आरोग्य सुविधा उपलब्ध असणे हे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. विशेषतः बालकांच्या आरोग्यासाठी तज्ज्ञ वैद्यकीय सेवा जवळच्या परिसरात उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

नगराध्यक्ष अविनाश माकोडे यांनी आधुनिक बालरोग वैद्यकीय सुविधा कळमेश्वरमध्ये उपलब्ध होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. या सुविधेमुळे परिसरातील पालकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उपाध्यक्ष धनराज देवके यांनी बालवयातील प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, नियमित तपासणी आणि वेळेवर उपचार यांचे महत्त्व अधोरेखित केले. नगर परिषद सदस्य सौ. सवितातार्ई सुनील नाथे यांनी बालकांचे आरोग्य आणि सर्वांगीण विकास यांना प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. तर उद्योजक सुनील नाथे यांनी लहान शहरांमध्ये अशा दर्जेदार आरोग्य सुविधा निर्माण होणे ही प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बाब असल्याचे सांगत क्लिनिकच्या संपूर्ण चमूला शुभेच्छा दिल्या.

तज्ज्ञ बालरोगतज्ज्ञांकडून विशेष वैद्यकीय सेवा

या क्लिनिकचे नेतृत्व डॉ. रेणुका पाटील तांबट करीत असून, त्यांनी पुणे येथे बालरोग अंतःस्रावतज्ज्ञशास्त्राचे विशेष प्रशिक्षण घेतले आहे. बालरोग चिकित्सा तसेच बालकांच्या वाढ, विकास आणि हार्मोनविषयक समस्यांवरील विशेष उपचारांचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे.

या क्लिनिकच्या माध्यमातून सर्वसाधारण बालरोग तपासणी व उपचारांसह बालकांची उंची व वजनवाढ, शारीरिक आणि मानसिक विकास, वयात येण्यासंबंधी समस्या, बालस्थूलता, थायरॉईड विकार, बालमधुमेह, हाडांचे आरोग्य तसेच विविध हार्मोनविषयक आजारांवर विशेष वैद्यकीय मार्गदर्शन व उपचार उपलब्ध होणार आहेत.

प्रत्येक बालकाच्या निरोगी भविष्याचा संकल्प

बालकांचे आरोग्य हे केवळ एका कुटुंबाचे नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या उज्ज्वल भविष्याचे अधिष्ठान आहे. याच विचारातून कळमेश्वर व आसपासच्या ग्रामीण आणि शहरी भागातील कुटुंबांना आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि संवेदनशील बालआरोग्य सेवा सहज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने चैतन्य चिल्ड्रन्स क्लिनिकची सुरुवात करण्यात आली आहे. परमपूज्य स्वामी ब्रह्मचैतन्यजी यांच्या शुभाशीर्वादाने सुरू झालेला हा आरोग्यसेवेचा उपक्रम कळमेश्वरच्या वैद्यकीय क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर, निमंत्रित, हितचिंतक आणि सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानण्यात आले.

फुलाची सुरुवात कळीपासून,
तर दिवाळीची सुरुवात
आपल्या माणसांपासून
दीपपर्वाच्या हार्दिक शुभेच्छा!

दैनिक
सिंहवाणी वृत्त

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

८ दिनांक : शुक्रवार, ६ नोव्हेंबर २०२६



धनत्रयोदशी : आरोग्य, धन, समृद्धी आणि संस्कृतीचा मंगलमय संगम

माधुरी धनोकार
अकोला

भारतीय संस्कृती ही सण, उत्सव, परंपरा आणि संस्कारांनी समृद्ध झालेली आहे. आपल्या प्रत्येक सणामागे काहीतरी धार्मिक, आध्यात्मिक, सामाजिक आणि नैतिक संदेश दडलेला असतो. भारतीय सण हे केवळ आनंद साजरा करण्याचे माध्यम नसून जीवनाला सकारात्मक दिशा देणारे संस्कारपर्व आहेत. अशाच मंगलमय आणि आनंददायी सणांपैकी एक महत्त्वाचा सण म्हणजे धनत्रयोदशी! दिवाळीच्या पाच दिवसांच्या उत्सवाची सुरुवात धनत्रयोदशीपासून होते. त्यामुळे या दिवसाला दीपावलीमध्ये विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

धनत्रयोदशी हा सण आश्विन महिन्यातील कृष्ण पक्षातील त्रयोदशी तिथीला साजरा केला जातो. या दिवसाला धनतेरस असेही म्हटले जाते. 'धन' म्हणजे संपत्ती आणि 'त्रयोदशी' म्हणजे तेरावी तिथी. या दिवशी धन, आरोग्य, सुख-समृद्धी आणि ऐश्वर्याची देवता असलेल्या देवी लक्ष्मीचे, तसेच धनाचे अधिपती कुबेर यांचे पूजन केले जाते.

त्याचबरोबर आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणारे भगवान धन्वंतरी यांचीही पूजा केली जाते.

भगवान धन्वंतरी आणि धनत्रयोदशीचे धार्मिक महत्त्व

पौराणिक कथेनुसार, देव आणि दानवांनी अमृतप्राप्तीसाठी समुद्रमंथन केले होते. या समुद्रमंथनातून अनेक अमूल्य रत्ने आणि दिव्य वस्तू प्रकट झाल्या. त्याच वेळी भगवान धन्वंतरी हातात अमृतकलश घेऊन प्रकट झाले, अशी धार्मिक मान्यता आहे. भगवान धन्वंतरी यांना आयुर्वेदाचे जनक मानले जाते. त्यांनी मानवजातीला आरोग्य आणि उपचारशास्त्राचा अमूल्य वारसा दिला.

म्हणूनच धनत्रयोदशी हा दिवस धनाच्या पूजनासोबत आरोग्याच्या पूजनाचाही दिवस मानला जातो. आजच्या काळात माणूस पैसा, प्रतिष्ठा आणि भौतिक सुखांच्या मागे धावत असताना आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. परंतु कितीही संपत्ती असली तरी शरीर निरोगी नसेल, तर त्या संपत्तीचा आनंद घेता येत नाही. म्हणूनच भगवान धन्वंतरींच्या पूजनातून आपल्याला आरोग्य हेच खरे धन असल्याचा अनमोल संदेश मिळतो.

देवी लक्ष्मी आणि कुबेर पूजनाचे महत्त्व

धनत्रयोदशीच्या दिवशी घरातील देवघरात देवी लक्ष्मी आणि कुबेर यांचे पूजन केले जाते. अनेक कुटुंबांमध्ये सोन्या-चांदीच्या वस्तू, नवीन भांडी, धातूच्या वस्तू किंवा इतर शुभ वस्तू खरेदी करण्याची परंपरा आहे. नवीन वस्तू घरात आणल्याने वर्षभर सुख-समृद्धी नांदते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. देवी लक्ष्मी ही संपत्ती, ऐश्वर्य, वैभव आणि समृद्धीचे प्रतीक मानली जाते. मात्र लक्ष्मीचे आगमन केवळ धनसंपत्तीपुरते मर्यादित नसून घरातील आनंद, समाधान, प्रेम, एकोपा आणि सकारात्मक विचार यांच्याशीही जोडलेले आहे.

ज्या घरात स्वच्छता, शिस्त, परस्पर आदर, कष्ट करण्याची वृत्ती आणि समाधान असते, त्या घरात खऱ्या अर्थाने समृद्धी नांदते. केवळ पैशाने माणूस श्रीमंत होत नाही, तर त्याच्या विचारांची श्रीमंती, मनाची उदारता आणि दुसऱ्यांच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती त्याला खऱ्या अर्थाने संपन्न बनवते.

धनत्रयोदशी आणि स्वच्छतेचे महत्त्व

दिवाळीच्या आगमनापूर्वी घराची स्वच्छता करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत प्राचीन काळापासून चालत आली आहे. घरातील प्रत्येक कोपरा स्वच्छ केला जातो. देवघराची सजावट, दारासमोरील रांगोळी, तोरण, फुलांची आरास आणि दिव्यांची रोषणाई यामुळे संपूर्ण घर प्रसन्न आणि मंगलमय दिसू लागते.

या स्वच्छतेमागे केवळ धार्मिक भावना नसून आरोग्य आणि स्वच्छतेचा सुंदर संदेशही आहे. स्वच्छ परिसरामुळे आरोग्य चांगले राहते आणि मन प्रसन्न होते. घरातील अनावश्यक वस्तूंची विल्हेवाट लावून नव्या विचारांना आणि नव्या सुरुवातीला जागा निर्माण करण्याची ही एक सुंदर संधी असते. धनत्रयोदशी आपल्याला बाह्य स्वच्छतेसोबत अंतर्मनाच्या स्वच्छतेचीही आठवण करून देते. मनातील मत्सर, द्वेष, अहंकार आणि नकारात्मक विचार दूर करून प्रेम, आपुलकी, सद्भावना आणि माणुसकीची ज्योत प्रज्वलित करणे हाच या सणाचा खरा अर्थ आहे.

यमदीपदानाची परंपरा

धनत्रयोदशीच्या दिवशी सायंकाळी घराच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा दक्षिण दिशेला यमदीपदान करण्याची परंपरा आहे. मृत्यूचे देवता यमराज यांना उद्देशून हा दीप प्रज्वलित केला जातो. कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य उत्तम राहावे, दीर्घायुष्य लाभावे आणि अकाली मृत्यूचे संकट दूर राहावे, अशी धार्मिक श्रद्धा या परंपरेमागे आहे. मातीच्या पणतीत तेल किंवा तूप घालून वात प्रज्वलित केली जाते. त्या छोट्याशा दिव्याचा प्रकाश आपल्याला जीवनातील अंधार दूर करून आशेचा किरण निर्माण करण्याची प्रेरणा देतो. दिवा कितीही लहान असला तरी तो अंधाराशी लढण्याची ताकद ठेवतो. हाच संदेश आपल्या जीवनालाही लागू होतो.

धनत्रयोदशी आणि सामाजिक बांधिलकी

आजच्या आधुनिक युगात धनत्रयोदशी साजरी करताना तिच्या सामाजिक महत्त्वाचाही विचार करणे आवश्यक आहे. सण साजरा करताना अनावश्यक खर्च टाळून गरजू, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे हीसुद्धा समृद्धीची खरी ओळख आहे.

आपल्या घरात दिवाळीचा आनंद साजरा होत असताना एखाद्या गरजू कुटुंबाच्या घरातही आनंदाचा दिवा प्रज्वलित व्हावा, एखाद्या गरीब मुलाच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, एखाद्या वृद्ध व्यक्तीला आधार मिळावा, एखाद्या निराधार महिलेला मदतीचा हात मिळावा, यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. दान, सेवा, सहकार्य आणि माणुसकी हीसुद्धा धनाचीच वेगवेगळी रूपे आहेत. पैसा खर्च करून मिळणारा आनंद काही काळ टिकतो; परंतु दुसऱ्याच्या जीवनात आनंद निर्माण केल्याने मिळणारे समाधान चिरंतन असते.

आजच्या काळात धनत्रयोदशीचा संदेश

आजच्या स्पर्धात्मक आणि धावपळीच्या जीवनात प्रत्येक व्यक्ती अधिकाधिक पैसा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. घर, गाडी, दागिने, व्यवसाय आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरू आहे. परंतु या सर्व गोष्टी मिळविताना आपण कुटुंबाला वेळ देतो का? आपल्या आरोग्याची काळजी घेतो का? आपल्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवतो का? आपल्या आसपासच्या गरजू व्यक्तींच्या अडचणी समजून घेतो का? याचाही विचार होणे गरजेचे आहे.

धनत्रयोदशी आपल्याला संपत्ती कमावण्याबरोबरच तिचा योग्य उपयोग करण्याची शिकवण देते. प्रामाणिकपणे कष्ट करून मिळविलेले धन, योग्य नियोजनाने केलेली बचत, कुटुंबाच्या गरजांची पूर्तता, आरोग्याची काळजी आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी या सर्व गोष्टी जीवनाला समृद्ध करतात. खरे तर माणसाच्या जीवनातील पाच महत्त्वाची धने म्हणजे आरोग्य, ज्ञान, संस्कार, समाधान आणि माणुसकी! ही धने जितकी अधिक समृद्ध असतील, तितके जीवन अधिक सुंदर आणि अर्थपूर्ण होईल.

धनत्रयोदशी हा केवळ सोने-चांदी खरेदी करण्याचा किंवा धनाची पूजा करण्याचा दिवस नाही, तर आपल्या जीवनातील खऱ्या संपत्तीची ओळख करून देणारा दिवस आहे. भगवान धन्वंतरींच्या पूजनातून आरोग्याचे महत्त्व, देवी लक्ष्मीच्या पूजनातून समृद्धीचे महत्त्व, कुबेर पूजनातून धनाचे महत्त्व आणि यमदीपदानातून जीवनाच्या मौल्यवान अस्तित्वाची जाणीव होते. या धनत्रयोदशीला आपण आपल्या घरात दिवे प्रज्वलित करूया; पण त्याचबरोबर दुसऱ्यांच्या जीवनातही आनंदाचा प्रकाश निर्माण करूया. घरातील देवघरासोबत आपले मनही भक्तिभावाने उजळूया. संपत्तीबरोबर सद्गुणांची, वैभवाबरोबर संस्कारांची आणि आनंदाबरोबर माणुसकीची जपणूक करूया. कारण सोन्या-चांदीपेक्षा आरोग्य अनमोल आहे, पैशापेक्षा समाधान मोठे आहे आणि संपत्तीपेक्षा माणुसकीचे धन सर्वश्रेष्ठ आहे!

चला, या धनत्रयोदशीला समृद्धीचा संकल्प करूया, आरोग्याची काळजी घेऊया, नात्यांमधील प्रेम जपूया आणि माणुसकीच्या प्रकाशाने प्रत्येकाचे जीवन उजळवूया. आपणा सर्वांना धनत्रयोदशीच्या मनःपूर्वक मंगलमय शुभेच्छा!

-८४८२९६०११९

पर्यावरणपूरक दिवाळी : प्रदूषण आणि आरोग्य

डॉ. प्रकाश पांडे
वाशीम

खरं म्हणजे पर्यावरणपूरक ही संकल्पना दिवाळीच काय प्रतेक सणांच्या बाबतीत प्रत्येकाच्या मनात अषली पाहिजे कारण गणेश उत्सव, दुगार्देवी, भुलाबाई यामध्ये देवतांच्या मुर्त्या पी ओ.पी आणि इतर प्लॅस्टिक सारख्या घटकांपासून बनवलेल्या असतात त्या पाण्यात विरघळत नाहीत आणि सणावारासाठी पुजेसाठी वापरले जाणारे बेल फुले याचं होणारे निर्माल्य आपण नदी विहिरीत टाकून ते कुजल्यानंतर एक दुषित वायू तयार होऊन आरोग्याला हानिकारक ठरतो.

पूर्वापार चालत आलेली परंपरा फटाक्यांविना दिवाळी साजरी झाली असं कधी झालंच नाही, आणि निव्वळ फटाके उडवुच नका असं कुणी म्हणतही नाही, पण यामुळे होणारे ध्वनिप्रदूषण, वायूप्रदूषण याकडे डोळेझाक करून चालेल का? आजकाल आनंदोत्सवाच्या नावाखाली याचा एव्हढा अतिरेक झाला की कर्कश आवाज , त्यातून निघणारा विषारी धूर यामुळे ध्वनी प्रदुषण,वायू प्रदूषणामुळे समस्त मानव आणि प्राणिमात्रावर होणारे विपरीत परिणाम होऊन कुणी अपंग होऊ शकतो, कितीवेळा आपण मुलांचे साठ टक्के पर्यंत अंग भाजलेले आणि



कधी कधी जीवावरही बेतलेले पाहीले आहे , मग आपण हा कशाचा आनंदोत्सव साजरा करतो आणि कशासाठी हेच समजत नाही.

या फटाक्यांच्या अतिरेकाने विशेषतः वृद्ध व्यक्ती जे उच्च रक्तदाब, फुप्फुसाचे विकार दमा, श्वासनलिका दाह यांसारख्या आजारात वायू प्रदूषणामुळे जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, आणि ध्वनिप्रदूषणाने हृदय घात येऊन मृत्यू येऊ शकतो. त्याचबरोबर सामान्य माणसाला सुद्धा दमा सारखे आजार होऊ शकतात.

लहान नवजात बालकांना तर वायू प्रदूषणामुळे फुप्फुसावरन दाह तर होतोच पण ध्वनी प्रदुषणामुळे कानाचे पडदे फाटून कायमची कर्णबधीरता येऊ शकते आणि जास्तीच्या आवाजाने मुलं दचकत राहिल्याने मेंदूचे, मानसिक आजार होऊ शकतात. आणि दीपावली काळात फटाक्यांमुळे विशेषकरून लहान मुलांचे किती अपघात होतात हे आपण पहातच आहोत.

चेहरा,डोळे या अवयवांना इजा होऊन त्या भागाचे अपंगत्व सुद्धा येऊ शकते. पशूपक्षांनाही याचा खूप त्रास होतो.

त्यामुळे फटाक्यांचा मर्यादित अतिशय काळजीपूर्वक शक्यतो आकाशात उंच जाऊन फुटणाऱ्या फटाक्यांचा वापर करावा आणि फटाके उडवताना लहान मुलांकडे चुकुनही दुर्लक्ष करु नये मुले फटाके फोडत असताना मोठ्या व्यक्तीने सतत सोबत असावे, तरच दीपावली पर्यावरणपूरक होऊन आनंदोत्सव चांगल्याप्रकारे साजरा करता येईल, यात पर्यावरण चांगले ठेवले तरच आरोग्य चांगले राहील.

- ९७६३३४९३२८

मातीच्या दिव्यांतून उजळते संस्कृती, परंपरा आणि आनंदाचा दीपोत्सव!



दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा : मातीला सुंदर आकार देऊन दिवाळीचा प्रकाश घरोघरी पोहोचवणारे कुंभार बांधव आपल्या परंपरेचे खरे शिल्पकार आहेत. श्रीधर पाठक, कुंभार टोली, भंडारा
(छायाचित्र : चंदू लिमजे, भंडारा)

दिवाळी सणाला 'सासुरवाशिण चालली म्हायेराला'

मनीषा सोन्नेकर /
सोनकांबळे
देगलूर. जि. नांदेड

दिवाळी सण जवळ आला. तशी लक्ष्मी सुखाःवली. आता घुंगराची बैलगाडी घेऊन भाऊराया बोलवाया येणार या आनंदाने न्हाऊन गेली. रोज दाराकडं डोळे लावून भावाची वाट बघत अंगणात थांबायची. सांजयेळी तुळशीपाशी दिवा लावताना प्रार्थना करायची. "हे तुळशीमाय मला घ्यायला येऊदे माझा भाऊराया". दुसऱ्या दिवशी भाऊ आला. भावाला बघून लक्ष्मीच्या डोळ्यात आनंदाश्रू खेळू लागले. भावाने बहिणीच्या पाया पडल्या. लक्ष्मीने भावाला पाय धुवायला तांब्याभर पाणी दिलं. आईबाबांची ख्याल खुशाली विचारली. रात्रीची जेवणं झाली सारे निजले. लक्ष्मी मात्र म्हायेराच्या आठवणीत रममाण झाली.

दुसऱ्या दिवशी पहाटे तीनला उठून लक्ष्मीने अंगण सारवलं, पिठाची रांगोळी काढली, गाई-म्हशीला चारा दिला, चुल सारवली, ओवी म्हणत जात्यावर गहू-ज्वारीचं कांडण काढलं, पुरणपोळीचा स्वयंपाक केला, सगळी कामं आवरली. सासू सासऱ्यांच्या आणि पती रायांच्या पाया पडून पहाटेच्या धुक्यातच लेकरं आणि लक्ष्मी भाऊराया संगं म्हायेराला निघाली. वासुदेवाची गाणी, बैलगाडीच्या घुंगरांचा आवाज, पहाटेची धुके, पक्ष्यांचा चिवचिवाट, गुलाबी थंडी, सूर्याची कोवळी किरणे, मंद वाऱ्यावर डोलणारी झाडे, वेली, पाने, फुले, पिके, पाना-फुलांवर मोतीरुप दवबिंदू, जाई, जुई, मोगरा, चमेली, चाफा, गुलाब फुलांचा दरवळणारा सुगंध घेत लक्ष्मी सुखावून गेली. थंडीने लेकरं काकडून लक्ष्मीच्या कुशीत झोपली होती.म्हायेराच्या वाटेकडं



आसवं भरलेल्या डोळ्यांनी बघू लागली.

दिवाळी सणाला म्हायेरवाशीण चालली म्हायेराला
बिगी बिगी चल रं भाऊराया ने मजं म्हायेरा

घरी पोहोचली अंगणात आईबाबा वाट बघत उभे होते. लगबगिने उतरून लक्ष्मी आईबाबांना बिलगली. आईने भाकरीचा तुकडा ओवाळून टाकला. आजोबांनी लेकरांना उचलून घेतलं. लक्ष्मी आत देव्हाऱ्यात गेली देवाच्या पाया पडल्या. लगेच आई स्वयंपाकाला लागली. सगळ्यांची जेवणं झाली.

आई आणि लक्ष्मी फराळाच्या तयारीला लागल्या. लेकरं बाहेर अंगणात आजोबांसोबत खेळु लागली. दिवस गेला. सांजायेळ झाली. लक्ष्मीने दिवे लावले. जेवणं आटोपली आणि अंगणात अंथरून टाकलं. लेकरं आजोबांच्या अंगावर खेळू लागली. अंथुरणावर लोळू लागली. चंद्राच्या प्रकाशात चांदण्या बघत माईलेकीच्या गप्पा रंगल्या.आईने हातावर शिवलेल्या गोधड्या अंगावर घेताच लक्ष्मीला झोप लागली.

धुक्यांनी सजलेली झूजूमुंजू पहाट झाली. आईने तुराट्या, चिपाडं, वाळलेलं गवत गोळा करून शेकोटी केली. लेकीला, नातवांना घेतलं नि सर्वजण शेकोटी जवळ बसले. लक्ष्मी आईला बिलगून बसली. लक्ष्मीला शेकोटीपेक्षा खरी ऊब आईच्या पदरात व कुशीतच मिळत होती. आई नि लक्ष्मी कामाला लागल्या. लक्ष्मीने गाई-म्हशीच्या ताज्या शेणाचा अंगणात सडा टाकला, सारवन केलं, रांगोळी काढली, घरादाराला तोरण बांधले, फुलामाळानी सारं घर सजवलं. लक्ष्मीने गाईचा गोठा धुऊन स्वच्छ केला.

गोठ्याला छान सजवलं, गाईंना सजवलं, शेणाच्या गवळणी, गाई-वासरे, म्हशी व इतर वस्तू बनवून हळद कुंकू वाहून मनोभावे त्यांची पूजा केली. आईसोबत पुरणपोळीचा स्वयंपाक केला. सर्वांनी मिळून गाईला नैवेद्य दाखविला. वसुबारस सण साजरा केला.

आनंदाने सारं घरदार न्हाऊन, उजळून निघालं होतं. लक्ष्मीने लक्ष्मी पूजन, भाऊबीज सगळी सणं आनंदात, उत्साहात साजरी केली. आईबाबांनी लक्ष्मीला, नातवांना नवीन कापडं घेतली. मायीलेकी मिळून फराळाचं बनवलं. सांजयेळी लक्ष्मीने दिवे लावले. लेकरांनी फटाके, सुरसूरबत्ती, फुलझडी लावून "दिन दिन दिवाळी "म्हणत आनंदाने नाचू लागली. दिव्यांनी सारं घर उजळून निघालं. गावातील आया बहिणींना फराळाला बोलावलं. सासरच्या गमतीजमती सांगितल्या. दहा दिवस लक्ष्मी म्हायेरात आई वडिलांसोबत, भाऊरायासोबत सुखाने राहिली. तासभर उशिरा उठली, शेत शिवारी फेरफटका मारली, आईसोबत जात्यावरच्या ओव्या गाईली, फुगडी खेळली, बांगड्या भरल्या. लक्ष्मीने दिवाळी सण आनंदात साजरा केला.

आपल्या भारतीय हिंदू संस्कृतीतिल सर्वात मोठा सण "दिवाळी सण". हा फक्त सण नाही तर नात्यांचा उत्सव साजरा करणारा सण होय. दूरच्या गाठी भेटी करून प्रेमाने, जिव्हाळ्याने सर्वांना एकत्र आणतो. सात दिवस नात्यांच्या उत्सवात सर्वांना प्रेमाने, मायेने, आपुलकीने बांधून ठेवतो. दिवाळी सण जवळ आला कि म्हायेराची ओढ लागते. चित्त थाऱ्यावर राहत नाही, मनाची घालमेल सुरु होते, कधी एकदा भाऊ येतो आणि माहेरी घेऊन जातो असं होतं.

प्रत्येक म्हायेरवाशीणीसाठी दिवाळी सण जिव्हाळ्याचा विषय असतो. सासर घरचा सारा क्षीण, मरगळ म्हायेरात धुतल्या जातो. म्हायेरवाशीणी साठी दिवाळी हा फक्त सण नाही, तर म्हायेरात आईच्या हातचं रोज गरम गरम जेवण, वडिलांसोबत गप्पा गोष्टी, उशिरा उठणं, मनसोक्त हुंदडणं, झोपा काढणं आणि सर्वात महत्वाचं म्हणजे म्हायेरवाशीणीला म्हायेरात खऱ्या अर्थाने जीवाला, मनाला, हाताला आराम मिळतो. "झोप गं माय" म्हणत आई अंगावर अजून दोन गरम गोधड्या टाकते. तेव्हा निवांत, शांत, बेफिकीर झोप लागते. एकंदरीत काय, तर काळ जरी बदलला असला तरी खऱ्या अर्थाने आजही सणवार खेड्यापाड्यातच साजरे होतात. कारण, इथे माणसांना नि सणांना तेवढेच महत्व दिले जाते.

- ९९६००२८८९९